# " रंग माझा खाकी "

*"The best way to FIND yourself is to LOSE yourself in the SERVICE of OTHERS."*

*Mahatma Gandhi*

" इतरांच्या सेवेत स्वतःला **समर्पित** करा.
तुमचा **'स्व'** तुम्हाला सापडेल."

महात्मा गांधी

Vol - II, July 2020

# INDEX


१. विद्यार्थ्यांची 'दशा' रोखण्यासाठी पोलीसांची 'पूर्वदिशा'!

**OUT OF THE WAY !**

२. पोलिसांचे ११,२०० आजी-आजोबा आणि हा आकडा वाढतच आहे !

**11,200 & COUNTING !**

३. पोलीसही 'पास' करतात !

**100% PASS !**

४. पोलीसांची 'एअर फोर्स' सेवा !

**KYA BAT HAI !**

५. ये रे ये रे पैसा !

**MONEY BACK GUARANTEE !**

६. अफवांचा समाचार !

**CULLING THE CULPRITS !**

७. अभिनव प्रबोधन !

**CHALE CHALO !**

८. वेळेवर मदत मोलाची, वाढवली शान खाकीची !

**NO KIDDING !**

९. जीव झाला येडापिसा !

**IN THE NICK OF TIME !**

१०. खाकीतले वीर !

**EARLY BIRDS TO THE RESCUE !**

११.. पोलीसांनी घेतली 'दोन जीवांची' काळजी !

**OFFLINE DLIVERY !**

१२. खाकी वर्दीतली 'प्रेमळ स्त्री' !

**LADIES SPECIAL !**

१३. वर्दीतील श्रावण बाळ !

**REACHING OUT !**

१४. प्रकाश आपुलकीचा !

**EYES FOR THE BLIND !**

१५. खाकीतले पुण्यकर्म !

**FUTURE SECURED !**

१६. वेळेत मदत !

**HOME DELIVERY !**

१७. वेळेवर जीवनदायी मदत !

**TAKING THE TROUBLE !**

१८. खाकी आणि माणुसकी !

**JAIN JEVAN !**

# INDEX


१९. फाईव्ह मॅन आर्मी !

HOLDING FORT !

२०. तातडीच्या क्षणी...पोलीसांची हजेरी !

CALL KHAKI FOR EMERGENCY !

२१. रक्ताचा 'प्लॅन बी'!

BARD OF BLOOD !

२२. लॉकडाऊनध्ये पोलीसांचीही 'परीक्षा' !

ALL ROUND HELP !

२३. हातावरचं पोट आणि आभाळाचे छप्पर !

HOMING IN !

२४. गोल्डन ज्युबिली सेलिब्रेशन !

GOLDEN JUBILEE HIT !

२५. पेशंटसाठी पोलीसांनी केले 'ऑपरेशन' !

OPERATION BRAINSTORM !

२६. पोलीसांची 'पोटभर' माया...!

THOUGHT FOR FOOD !

२७. गायीच्या पोटाची पोलीसांनाही काळजी !

FODDER TIME !

२८. 'काळ' आला पण पोलीसांनी 'वेळ' लांबवली. !

A LIFE SAVED !

२९. पोलीसांचा 'सामोपचार'!

SETTING IT RIGHT !

३०. शौर्याची संकटावर मात!

TAKING ON AMPHAN !

३१. खाकी वर्दीतली माया !

PICK UP N DROP !

३२. झरा माणुसकीचा !

TOUCH THE HEART !

३३. 'खाकीतला देवदूत' !

FOOD FOR THE SOUL !

३४. पोलीसांनी केली 'घरवापसी' !

MOVING THE MASSES !

३५. पोलीसांचे 'अन्नछत्र' !

COMMUNITY CARE !

३६. पोलीसांनी टाळली नागरिकाची आत्महत्या !

IN THE NICK OF TIME

३७. पोलीसांची 'इमर्जन्सी ॲक्शन' !

ACCIDENT DAMAGE REPAIR !

# प्रस्तावना / चार शब्द

सर्वसामान्य काळामध्ये पोलीस कर्मचारी गुन्ह्यांचा तपास आणि प्रतिबंधन यासंबंधी पुढाकार घेऊन काम करत असतात. कोविड महासाथीसारख्या आव्हानात्मक काळामध्ये पोलिसांनी नागरिकांच्या कल्याणासाठी आणि सुविधांसाठी अथक परिश्रम घेतले आहेत. एखादी गोष्ट 'करा' असं सांगण्यापूर्वीच ते कर्तव्यासाठी हजर होते. हे एका माणुसकीच्या स्वाभाविक कर्तव्यतत्पर ऊर्मीने घडले होते.

२) जेव्हा **सेवेची संधी** चालून आली तेव्हा संपूर्ण पोलिस दलाची एक क्षणभरसुद्धा चलबिचल झाली नाही.
**गरज** उत्पन्न झाली तेव्हा पोलीस मदतीसाठी तयार होते.
मॅन्युअल्स पाहिली नाहीत.
ड्युटी चार्ट पाहिले नाहीत.
प्रश्न विचारले नाहीत.
ते फक्त कामावर हजर झाले.

३) एस डी जी ने समाजमाध्यमांवर घेतलेल्या **'पब्लिक पल्स सर्वेक्षणा'**त केवळ पाच दिवसांत **२२,७९१ लोकांनी प्रतिसाद** दिला आणि ८३% लोकांनी पोलिसांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. त्यांना भावलेल्या पोलिसांच्या **'सर्वोच्च दशगुणांची'** यादी या पुस्तकाच्या' लपृष्ठावर दिली आहे.

४) या कठीण काळात सर्व स्तरांवरील पोलीस अधिकाऱ्यांनी सुरक्षित घरवापसीसाठी काळजी आणि प्रेमाने अत्यंत **माणुसकीचे दर्शन** घडवले आहे आणि घडवत आहेत, आणि हे करताना ते त्यांच्या समान्य अपेक्षित कर्तव्याच्या कितीतरी पलीकडे गेले आहेत.

५) हे पुस्तक म्हणजे वरील ८३% मधील काही **खऱ्याखुऱ्या** घटनांचे संकलन आहे. या अभूतपूर्व, असामान्य परीक्षेच्या काळातील आमच्या कर्तव्याच्या कामाला दिलेली उत्स्फूर्त दाद आहे.

पोलीस आयुक्त
पुणे शहर
जुलै २०२०

# Preface / a word...

In ordinary times, Police personnel proactively work for the prevention, deterrence and detection of crime. In challenging times like COVID pandemic, police has worked tirelessly for the welfare and comfort of the citizens. Even before they were told to do a particular thing, they were there to serve. It came as a natural, duty bound, humane instinct.

2. When the '**opportunity** *for* **service**' came knocking, the entire force did not even blink for a second.

If there was a **need**, the police was there to help.
No manuals referred.
No duty charts.
No questions asked.
*They were simply there*.

3. In the '**Public Pulse Survey'** taken on social media by SDG, **22,791 people responded** in just five days and **83%** of them lauded the work done by police. The **'TOP TEN Attributes**' of police as perceived by them is given on the back cover of this book.

4. During this difficult time, Police officers across the board have done and are doing **Excellent Humane** job of *caring*, uniting families and ensuring safe passage back home, all beyond the normal call of duty.

5. This book is a compilation of some of the ***real***-life incidents that comprised the above 83%. It is a testimony to the instinctive genuineness of our actions of service during an unparalleled, unique crisis.

Commissioner of Police,
Pune City
July 2020




# विद्यार्थ्यांची 'दशा' रोखण्यासाठी पोलीसांची 'पूर्वदिशा'

लॉकडाऊन मुळे बाहेर गावाहून पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची चांगलीच अडचण निर्माण झाली होती. असाच एक गोखलेनगरमध्ये राहणारा विद्यार्थी. गावाकडे घरची अवस्था आधीच हलाखीची. त्यामुळे या मुलाकडे पैसे नव्हते. खाण्या पिण्याचे हाल सुरू होते. एकंदरित त्याची मानसिकता बिघडत चाललेली.

पण त्याने एक योग्य निर्णय घेतला. पुणे पूर्व विभागातील अपरपोलीस आयुक्त श्री. सुनील फुलारींना त्याने फोन केला आणि आपली परिस्थिती सांगितली. त्याची अवस्था पाहून फुलारी साहेबांनी लगेच चतृश्रृंगी पोलीस ठाण्यातील पो. नि. श्री. समीर चव्हाण यांना फोन करून या विद्यार्थ्यास मदत करण्याचा आदेश दिला. श्री. चव्हाण यांनी तत्काळ हालचाली करून विद्यार्थ्याची वैद्यकीय तपासणी केली आणि त्याला सोलापूरला जाण्यासाठी ई–पास मिळवून दिला व त्याला मुळगावी पाठवून दिले. पोलीसांचे हे सहकार्य पाहून त्या विद्यार्थ्याने मनापासून आभार मानले. पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. इथं येणाऱ्या विद्यार्थ्यांची दशा होऊ नये. तर त्यांना योग्य दिशा मिळावी यासाठी पुणे पोलीस नेहमीच सज्ज आहेत.



# OUT OF THE WAY !

When Addl CP East Region Sunil Phulari's official phone rang, at his office, it was he who picked up. At the other end was a highly distressed student, almost sounding suicidal, and wanting help desperately. Phulari calmed him down, took his number and passed on the case to API Sameer Chavan.

Sameer called him and then taking his address drove down to meet him. He was confronted with an unsettled youth, staying all alone in a rented flat, his friends having left him, having come to the city for his UPSC exams.

Says Sameer, “Further inquiries revealed that he was getting suicidal because he was all alone, couldn't afford to pay the rent, and also had no money for food.”

“We not only arranged for his daily food, reveals Chavan, but Phulari sir even gave him cash, and asked me to arrange for a pass for him, to be sent back by a special bus to his native village to his parents.”

Within a day everything was arranged, his rent issues sorted out, his food, and even his return, thanks to Addl CP Phulari and the groundwork of Chavan, the boy was safely back in his hometown. A job well done,even if it meant going out of the way, which by the way, is now the Khaki way!



## पोलिसांचे ११,२०० आजी-आजोबा आणि हा आकडा वाढतच आहे...

कोरोनाचे सर्वात जास्त भय कोणाला वाटत असेल तर ते म्हणजे ज्येष्ठ नागरिक. ही भीतीही साहजिकच कारण उतारवयात प्रतिकारशक्तीही कमी झालेली आणि इतर आजारही कायमचे पाहुणे म्हणून आलेले असतात. त्यामुळेच पुणे गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंह यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी १०९० ही हेल्पलाईन सुरू केली. पण त्यावर फक्त १०-१२ फोन आले आणि तेही चौकशीसाठी. कधी काळी ज्येष्ठ नागरिकांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आजही ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय आहे.

त्यामुळे पुन्हा उपायुक्त बच्चन सिंहांनी पुढाकार घ्यायचे ठरवले. त्यासाठी पोलीस दलाच्या ज्येष्ठ नागरिक कक्षातील वा.पो.नि. वैशाली चांदगुडे आणि त्यांची टीम तैनात झाली. पोलीसांच्या डेटाबेसमधील सर्व ज्येष्ठ नागरिकांशी फोनवरून संवाद साधण्यासाठी हे सगळेच पुढे सरसावले. हा अनुभव फारच अविस्मरणीय असल्याचे वैशाली मॅडम सांगतात. जेव्हां पोलीस चौकशी करून तब्येतीची चौकशी करतात, काय हवं नको ते विचारतात, औषधांची विचारणा करतात आणि घराबाहेर न पडण्याचा प्रेमळ सल्लाही देतात तेव्हां या साऱ्या आजी-आजोबांची मनेही आनंदी होतात.

या कामामुळे ११,२०० आजी-आजोबांशी आमचंही एक अतूट नातं जुळलं हे सांगताना खाकी वर्दीतल्या वैशालीही थोड्या भावनिक होतात. आणि हे समाधान वेगळंच. त्यासाठीचवैशाली आणि त्यांच्या १० जणांच्या टीमने वेळेची पर्वा न करता एका दिवसात पाचशेहून अधिक फोन कॉल्स केले. आता त्यांच्या टीमच्या संख्या निम्मी झालेली आहे. पण हे कार्य आजही सुरू आहे. उतारवयात कोणीतरी आपली विचारणा करतंय हा अनुभवच ज्येष्ठांना धीर देणार असतो आणि इथे विचारणा करणारी व्यक्ती पोलीस दलातील आहे म्हटल्यावर आजी-आजोबांचा धीर आणखीनच वाढतो. हेच तर पोलीसांचं पुण्याशी आणि पुणेकरांशी असलेलं खरं नातं आहे... सद्रक्षणाय, खलनिग्रहणाय !



# 11,200 & COUNTING !

Yes, that's the number of outgoing calls that WPI Vaishali Chandgude and her team made from the Senior Citizen Cell Pune City Police to their database of 11,200 senior citizens. Says Vaishali, “They were so happy, when we called them, to ask about their health, and inquire if they needed any medicines or supplies and to request them not to move out, most of them asked us to take care of ourselves and our families. It was really heart-warming.”

Chandgude avers, “We used to clock more than five hundred calls a day, and we had a team of ten then, now we have half that.” When asked if they got any calls on 1090, the senior citizen help line number, she says, “Just between 10 and 12, that too mostly for inquiries. This initiative by the Pune City Police has gone down very well with them and public perception of the force has changed drastically.”

Indeed, the initiatives taken by the top brass and implemented thoroughly and capably by their respective teams has done a great deal to make the police people friendly. Salute to the Khaki tribe once again.




## पोलीसही 'पास' करतात !

लॉकडाऊनच्या काळातील ही घटना. एके दिवशी पुण्याच्या मा.पोलीस आयुक्त कार्यालयात फोन खणखणला. पलीकडून एक महिला बोलत होत्या. त्या रत्नागिरीतल्या एका खेड्यात रहात होत्या आणि त्यांच्या मुलीला गंभीर आजार होता. लॉकडाऊनच्या काळात नेमकी औषधं संपलेली. त्यामुळे तिच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. कोणत्याही परिस्थितीत रत्नागिरीहून त्यांना त्यांच्या वडिलांकडे पुण्याला यायलाच हवं होतं. त्यासाठी पोलीस पास काढायला हवा. एवढंच नव्हे तर जागोजागी तपासण्यांचा फेराही होताच. हा सगळा विचार करून त्या 'हिलेने मा.पोलीस आयुक्त कार्यालयात फोन करून विनंती केली. त्यावेळी कार्यालयात असलेले गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंह यांनी घटनेचं गांभीर्य ओळखलं आणि पी.आय. गीता दोरगेंकडे ही का'गिरी सोपवली. गीता मॅडम लगेच प्रवासासंदर्भातील आवश्यक ती सर्व माहिती घेऊन पासही दिला. एवढंच नव्हे तर त्या रत्नागिरीहून पुण्याला वडिलांकडे पोहचेपर्यंत, पी. आय. गीता मॅडम सतत त्यांच्या संपर्कात होत्या. पोलीसी चौकशीसाठी नाही तर काळजीपोटी ! पुणे पोलीस व पी. आय. गीता दोरगेंकडून मिळालेलं हे सहकार्य पाहून त्या महिला व त्यांच्या वडिलांनी मनापासून आभार मानले. आणि आम्हालाही समाधान वाटले. शेवटी आयुष्य ही एक परीक्षा आहे. त्यात कोणीच नापास होता कामा नये आणि म्हणूनच आम्हीही संधी मिळेल तेव्हां 'पास' करतोच.



# 100% PASS !

When WPI Geeta Dorge, attached to the Crime Branch Pune, got a call from her DCP Bachchan Singh regarding a lady caught in Ratnagiri with a young daughter who was pretty ill and wanting to come back, she wasted no time incalling her up.

" I remember, recollects Geeta, she sounded very upset, before the lockdown, this Kalayani Nagar resident of Pune, had taken her daughter to a remote village near Ratnagiri for some medical treatment, and now wanted to come back, as she wasn't doing too well, and her aged parents were all alone in the city".

Geeta and her colleagues now contacted her father, a senior citizen himself, and helped him through the process of filling an online form. Recalls Geeta, "The gentleman refused to let anyone else do it, and spent nearly half a day, calling me twenty times, to finally fill up the form."

Then they sent their own car and driver to Ratnagiri to fetch the lady and her daughter, and says Geeta, "So particular was the old gentleman that he insisted we make a pass for them from Pune limits to Kalyani Nagar, and we had to convince him that it was a 100 percent pass!"

Geeta avers, "The reached safely, and since then, the family must have called up almost daily to thank me. I was really happy." A job well done, and Khaki, well 100 percent pass!



## पोलीसांची एअर फोर्स' सेवा !

गुन्हे शाखेचे उपायुक्त श्री. बच्चन सिंह यांना एके दिवशी वायूदलातून निवृत्त झालेल्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा फोन आला. त्यांना काही मदत हवी होती. तो फोन ठेवल्यावर लगेचच श्री. बच्चन सिंह यांनी गुन्हे शाखेच्या विभाग पाचचे पो.नि. दत्तात्रय चव्हाण यांच्यावर हे कार्य सोपवले. चव्हाणांनी लगेच ॲक्शन घेत सहा.पो.नि. सुर्वे यांना त्या अधिकाऱ्यांच्या घरी पाठवले. सुर्वेनीही तत्काळ त्या अधिकाऱ्यांचे घर गाठून त्यांची चौकशी केली. साधारण ८० वर्षाचे वयोमान असलेले ते दोघे पती-पत्नी पुण्यात रहात होते. त्यांची मुलगी अभिनेत्री असून ती लॉकडाऊनमुळे मुंबईतच अडकली होती. अशात या अधिकाऱ्याच्या पत्नीची केमो थेरेपीही सुरू होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्वेनी कशीबशी आपल्या मित्राची कार आणि एक ड्रायवर मॅनेज करून त्या अधिकाऱ्यांसाठी हॉस्पिटलमध्ये जाण्या-येण्याची व्यवस्था केली. कोणत्याही इमर्जन्सीसाठी आपला नंबर त्या अधिकाऱ्यांना दिला. तीन दिवसानीच मध्यरात्री त्या अधिकाऱ्याचाफोन सुर्वेना आला. त्यांच्या पत्नीला सतत उलट्या होत होत्या आणि तत्काळ ओषधांची गरज होती. लगेच त्याच क्षणी पो.कॉ. संजय दळवी आणि हे.कॉ. अमजद पठाण हे दोघेही औषधं घेऊन त्या अधिकाऱ्यांच्या घरी पोहचलेसुध्दा । दुसऱ्या दिवशी सर्वेनी फोन केल्यावर कळलं की, त्या ओषधांमुळे अधिकाऱ्यांच्या पत्नींचा त्रास थांबला. नागरिकांना वायूगतीने मदत करणाऱ्या या टीमची ही 'एअरफोर्स सेवा' निश्चितच कौतुकास्पद व अभिमानास्पद आहे.


ASI Pradeep Surve

# KYA BAT HAI !

When DCP Crime Bachchan Singh received a call from a senior retired Airforce officer, stating that he needed help, he immediately dialed Unit 5 Crime Branch PI Dattatray Chavan, who assigned the job to ASI Pradeep Surve.

When Surve reached their house , he found that the couple was aged eighty , and that their daughter an actress in Bengali and Hindi films was based in Bombay and couldn't come to Pune because of the lockdown. He also came to know that the officer's wife was undergoing c hemotherapy at both Budhani and Ruby Hall He somehow managed to get a car and driver assigned to them through a friend for a whole week , and also shared his number in case of any emergency Says Surve.

" Three days later , in the dead of the night I got a call from the lady saying that she was vomiting non stop and needed medicines, 50, me and my colleagues PC Sanjay Dalvi and HC Amjad Pathan , together got the medicine and delivered it to her . On checking next day , she was feeling absolutely nine Once again , Unit 5 , under DCP Singh and PI Chavan , and of course Surve and his colleagues Pathanand Dalvi had delivered Wah Khaki , Kya Baat Hai !

‘‘धन्य धन्य तू वर्दीतल्या वीरा, तुला मानाचा आमचा मुजरा. जिथे मंदिरातला देव बुडाला होता, तिथे वर्दीतला देव धावून आला होता.’’

**रोहिणी शामराव भोकसे, म.पो.शि. ९२०५,**
**बंडगांर्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

‘‘ कायद्याचे रक्षण हेच आमचे ध्येय, गुन्हेगारी संपवणे हाच आमचा प्रयत्न. गुन्हेगारांना चांगला माणूस बनवणे हाच आमचा मान. आदर्श पोलीस बनण्यासाठी गेला जरी प्राण, तरी मला त्याचा अभिमान, कारण पोलीस माझी शान.’’

**स्वाती प्रमोद थोरात, म.पो.शि. ९६२०,**
**बंडगांर्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

‘‘ पाण्याचा झरा मोकाट सुटतो अशावेळी त्याला बांध घालण्याची गरज असते, तसेच समाजातील दुष्ट प्रवृत्तीला बांध घालण्याचे काम करतो तो पोलीस. ’’

**पोलीस नाईक, १४८२**

**जाधव सी कंपनी पोलीस मुख्यालय, पुणे शहर**

---

’’ सैनिक ज्या पद्धतीने सीमेवर प्राणपणाने देशाचे संरक्षण करतात, त्याच भावनेने आपण देशांतर्गत समाजात राहून कर्तव्य करतो. सैनिकांना त्यांचा शत्रू समोर दृश्य स्वरूपात दिसतो, आपले तसे नाही. सदैव लोकांमध्ये राहूनच वाईट प्रवृत्तींचा बिमोड आणि सज्जनांना पाठिंबा देत असतो त्यासाठी बुध्दिचातुर्याची सुद्धा गरज आहे. कारण समाजाच्या संरक्षणातच आपल्या पेशाचा खरा सन्मान आहे. ’’

**अजित लकडे**

**पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा**



# ये रे ये रे पैसा !

ऑनलाईनच्या जमान्यात सर्वांनाच आवडणारी गोष्ट म्हणजे 'कॅशबॅक ऑफर'! पुण्यातल्या प्रशांत बनेंच्या मोबाईलवरही असाच एक मेसेज आला आणि तोही चक्क 'फोन पे' संदर्भात. मग काय प्रशांत बनेंनी मागचा पुढचा विचार न करता आपली सगळी माहिती भरून टाकली आणि काही मिनिटातच तब्बल दीड लाख रूपये...पण ते बनेंच्या खात्यातून उडाले आणि ते स्वतःही जागेवर उडाले. नाव प्रशांत असलं तरी शांत रहाणार कसे? त्यांनी डायरेक्ट सायबर सेलचं ऑफिस गाठलं. एपीआय अश्विनी पाटील यांनी प्रकरणाचं गांभीर्य ओळखलं. सीनिअर पीआय जयराम पायगुडेंच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी एलपीसी ज्योती दिवाने,पीसी भूषण शेलार अशी सगळीच टीम इंटरेनटच्या मायाजालात घुसली. पाटील मॅडमनी प्रसंगावधान दाखवलं. ज्या खात्यात बनेंची रक्कम जमा होणार होती, त्या बँकेशी संपर्क साधून ते खातं ताबडतोब बंद केलं. त्या एका निर्णयाने चक्क १ लाख रूपये दुसऱ्या खात्यात जाता जाता परत बनेंकडे आले. आजच्या काळात लोकांचा बँकावर विश्वास नाही. पण जेव्हां जेव्हां पैशाची ऑनलाईन लूट होते तेव्हां पुणे सायबर सिटी सेल मात्र पुणेकरांना 'मनी बॅक गॅरंटी' देते. हा विश्वास सार्थ करणाऱ्या ज्योती मॅडम सारख्या अधिकाऱ्यांचा पुणे पोलीस दलाला अभिमान वाटतो. बनेंचे उरलेले पैसेही त्या लवकरच मिळवून देतील. पण ऑनलाईन लुटेऱ्यांनो, सावधान...तुमची डोकी कितीही चालत असतील तरी आमची खाकीही तुमच्यापेक्षा अलर्ट आणि सुपरफास्ट आहे.



# MONEY BACK GUARANTEE !

When Prashant Bane had received a call on his mobile number purportedly from PhonePe offering him a cash back offer. He gladly volunteered information about his account. Phishing was on, and within minutes, Bane was shocked to see that INR 1,50,000 wastransferred from his account!

He rushed to Pune City Cyber Celland met API Ashwini Patil, who swung into action, with help from her colleagues, LPC Jyoti Diwane, PC Bhushan Shelar, under the deft guidance of Sr. P I Jayram Paigude. Patil then communicated and sent a otice to the respective beneficiary bank for freezing the amount transferred from Bane's account. Due to her quick response to the complainant she was able to freeze a sum of INR 1,00,000/-

In a time and age when people doubt bank guarantees, here was a money back guarantee, coming from the Pune City Police Cyber Cell, a job well done Jyoti, who is now in the throes of tracking the criminals and trying her best to recover the pending amount. Fraudsters beware, the lady is on the prowl doing Khaki proud.



## अफवांचा समाचार !

कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावाच्या काळात अनेक अफवा पसरल्या होत्या. अशीच एक अफवा म्हणजे चिकनद्वारे हा व्हायरस पसरतो. बर्ड फ्लूच्या काळातले जुने फुटेज युट्युबवर दाखवण्यात येत होते. तत्काळ हे व्हिडीओज काढून टाकले आहेत.

हे व्हिडियोज व्हायरल झाल्यामुळे चिकनची मागणी खूप कमी झाली आणि पोल्ट्री व्यावसायिक, चिकन विक्रेते यांच्या धंद्यावर विपरीत परिणाम झाला. यासाठी सरकारच्या पशुधन विभागाने पुणे शहर पोलिसांच्या सायबर क्राईम शाखेत १९ फेब्रुवारी २०२० रोजी सदर व्हिडिओज बनवणाऱ्यांविरुद्ध तक्रार दाखल केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे आणि सहकाऱ्यांनी तपास करून संशयितांचा माग काढला. एक व्हिडीओ उत्तर प्रदेश तर एक हैद्राबादमधून अपलोड करण्यात आला होता. त्यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आणि आरोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पुणे पोलिसांच्या सायबर क्राईम शाखेने संपर्क साधल्यावर युट्युबने



# CULLING THE CULPRITS !

There was so much chicken around, selling at half rate, because everyone was chickening out of eating chicken in the cityas they were scared that it was one of the many causes of the pandemic! Social media, especially what's app was so full of it, that there were more feathers than in a poultry farm! Alarmed at this fake newsthe Department of Animal Husbandry, Government of Maharashtra, complained to the Pune City Police cyber cell. Hot on trail of the perpetrators was the amiable yet tenacious Sr. P I Jayram Paigude , who shot mail after mail to TikTok, You Tube and Google in a bid to trace the original IP's from where these videos had originated. “Says he, “They usually take four weeks to respond, & it's also a non-cognizable offence, but I pursued them, got results in days, and requested the honourable court to make it a cognizable offence, traced the culprits. One of them was in Hyderabad and the other in Uttar Pradesh”.

Both have been issued notices, the offensive and fake videos pulled out, and charge sheets are being filed as we speak. Certainly not one to chicken out, Paigude and his Cyber team are happy that the poultry farmers and chicken shop owners are doing roaring business once again! Cluck cluck to khaki!



## अभिनव प्रबोधन!

लॉकडाऊनचे उद्दिष्ट साध्य व्हावे व नागरिकांनी सुरक्षित राहावे यासाठी दत्तवाडी पो.स्टेशनचे सहा. फौजदार प्रमोद कळमकर यांनी अभिनव पद्धतीने जनजागृती केली. लगान चित्रपटातील गीताच्या चालीवर एक देश–एक भावना, तोडू साखळी रोखू कोरोना हे गाणे तयार करून, सर्व परिसरात त्याचे सादरीकरण केले. तसेच शासनाचे नियम समजावून सांगितले. हा उपक्रम यशस्वी झाला. वरिष्ठ पो. निरीक्षक श्री घेणारे, स.पो.नि. सुरेंद्र धुमाळे, पो.उ.नि. मनोज अभंग, श्री सपताळे , हवालदार शिरोळे, पो नाईक कुणाल माने, पो. कॉ. देवकर, सुरवसे, जाधव, भोसले, महिला कॉ. मीरा वाकोडे, सुजाता कदत या सर्वांची सादरीकरणात मोलाचे योगदान मिळाले. खाकी पोषाखातली क्रिएटिव्हिटी सर्वांना भावली!



# CHALE CHALO !

ASI Pramod Kalamkar is a multi-talented cop, with a ear for music and lyrics, as well as a deep base voice, which he put to great use thanks to a bit of prodding from Sr Police Inspector Gheware of Dattawadi Police Station.

“On my weekly off day, recalls Kalamkar, I wrote the lyrics of my song based on the famous ChaleChalo number from the hit Hindi film, “Lagaan”. When I sang it to Gheware Saheb, he loved it, and the next day I recorded it. “ Then the rest is stuff legends are made of! Kalamkar and his merry associates would move around their area, in the vans equipped with loudspeakers and play the song, while the associates played the beat by stomping their feet and clapping, Kalamkar would Karaoke and people really took to it, and stayed indoors! “We wanted to ram home the fact that Corona is deadly, and people must observe curfew and respect the lockdown rules and stay home, this was a softer way of doing it and people loved it, “remembers Kalamkar. Indeed, who says Khaki has no talent! It's everywhere!



## वेळेवर मदत मोलाची, वाढवली शान खाकीची !

१६ मे २०२० रोजी खडक पो. स्टेशनचे पोलीस नाईक इम्रान नदाफ हे काशेवाडीमध्ये चमनशाह दर्गा येथे बंदोबस्त ड्युटीवर होते. राजीव गांधी पतसंस्थेजवळ गर्दी जमलेली पाहून पोलीस मित्र अलीम शेख यांच्यासोबत जाऊन पाहिले असता एक ७ वर्षांचा मुलगा जखमी अवस्थेत त्यांना दिसला. दुचाकीच्या खाली अडकल्याने त्याच्या हातातून मोठा रक्तस्त्राव होत होता. बघायला खूप जण जमले होते परंतु कोरोनाच्या भीतीने कोणीही त्याला उचलून दवाखान्यात घेऊन जाण्यास धजावत नव्हते. या मुलाच्या घरची परिस्थिती हलाखीची असल्याने व त्यात सध्या कामधंदा बंद असल्याने त्याच्या वडिलांकडे त्याच्या उपचारांसाठी काय, रेशन आणायलाही पैसे नव्हते . मग श्री नदाम यांनी त्यांना दीड हजार रुपये दिले तसेच हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी आपली दुचाकी देऊ केली. त्या मुलाच्या हाताला ८ ते ९ टाके पडले होते . इम्रान नदाफ यांच्यामुळे त्या मुलावर उपचार झाले. एवढ्यावरच नदाम थांबले ाहीत. त्यांनी या कुटुंबाला १५ दिवस पुरेल इतके रेशन स्वखर्चाने घेऊन दिले. त्यांच्या रूपाने या कुटुंबाला एक देवदूतच भेटला .



# NO KIDDING !

PC Imran Nadaf attached to the Khadak Police Station was patrolling the Kashiwadi area when he noticed a huge crowd . On checking he found that a two wheeler had fallen on an 8 year old boy injuring his finger badly. "I immediately took out and wrapped my hankie on his hand and requested someone to take him to a nearby hospital for treatment as I could not leave the area . No one was willing to take their bike. I finally convinced someone to take mine but he said he had no money. I took out 1500 from the 1600 I had in my pocket and sent the boy on my bike."An hour later he was back , a smile on his face. Says Nadaf " It was worth a crore." Not one to give up half way he followed up, took the boy to get his stitches removed and even provided a month's ration to his family. A job well done and no kidding keeping the khaki flag flying high!

▶ ‘‘ मी जेव्हा खात्यामध्ये रस्त्यावर उभा असतो, तेव्हा तिथून जाणाऱ्या जनतेला मी येथे उभा आहे, तुम्ही निश्चिंत राहा, असा जणू संदेश देऊन खाकी त्यांना आपलेसे करत असते. ’’

**संदीप थावरू राठोड**
**पो.ना. १३७३ गुन्हे शाखा, पुणे शहर**

---

▶ ‘‘ देवाचा धाव केल्यावर देव येत नाही. पण प्रत्येक संकटात पोलीस हा धावत येत असतो पण लोकांना त्याची जाण नसते. आपण आपल्या कामाच्या जोरावर लोकांची टीका शाबासकी मध्ये कशी बदलेल हे पहावे. ’’

**सचिन सिध्देश्वर गायकवाड**
**पो.ना. ६५३० गुन्हे शाखा, पुणे शहर**

▶ '' असे म्हटले जाते की, प्रत्येक नागरिक हा साध्या गणवेशातील पोलीसच आहेत. ''

**सी. एम. निंबाळकर**
**पोलीस निरीक्षक, कोंढवा वाहतूक विभाग, पुणे शहर**

........................................................................................................................

▶ '' जिम्मेदारी मोठी समाजात राखण्याची, कायद्याच्या रक्षणाला उभा ठाकण्याची. मी पोलीस... जेथे हिंसा होते, तेथे शांती आणतो, जेथे कमकुवतपणा येतो, तेथे सामर्थ्य आणतो. ''

**चेतन दिलीप गायकवाड**
**पो.ना. १६८३, चंदन नगर पोलिस स्टेशन, पुणे**



## जीव झाला येडापिसा...!

कोरोनाने सगळ्या जगाला घरात बसवलं. काम बंद पण खर्च चालू अशी ही जीवघेणी परिस्थिती. त्यातूनच आत्महत्येची प्रकरणं समोर येत असतानाच कंट्रोल रूमचा फोन खणखणला. पलीकडून बोलत असलेल्या बीट मार्शलने मार्केटयार्डला एक तरूण आत्महत्येच्या प्रयत्नात असल्याची बातमी दिली. लगेच मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. निंबाळकर, स.पो.नि श्री. खटके, पो. उपनिरिक्षक श्री. भोसले, पो.ना. श्री. पडळकर, पो. शि. श्री. कोळी अशी टीम लगेच जागेवर पोहचली. फ्लॅटचे दार आतून बंद आणि बाहेर वातावरण तंग. कोणत्या क्षणी काय होईल सांगता येत नाही.

पण पोलीस टीमने आतल्या व्यक्तीचे मन वळविण्यात यश मिळवले. त्याने दरवाजा उघडला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्या व्यक्तीचे नाव शुभम गुप्ता. जुन्या कार खरेदी–विक्रीचा व्यवसाय. लॉकडाऊनमुळे काही व्यवहार अडकलेले. त्यातूनच देणेकर्यांचे फोन त्याला थेट आत्महत्येच्या विचारांपर्यंत गेले. पण पोलीसांनी त्याचे मानसिक समुपदेशन केले आणि नंतर शुभमच्या मनानेही उभारी घेतली. आत्महत्येचा विचार कायमचा मनातून काढून टाकला. कोणाच्याही मनात जीव द्यायचा विचार आला तर आम्हां पोलीसांकडे पाहावं. आम्ही आमचा जीव धोक्यात घालून तुमचा जीव वाचवतो. हेच तर खरं जीवन. होय ना !



# IN THE NICK OF TIME !

When PI SS Nimbalkar learnt that a young man, whose businesses were suffering losses, was trying to commit suicide in a society in Market Yard, he and his team dropped everything that they were doing and rushed to his rescue.

Says Nimbalkar, “The door was bolted from within, the family was creating a ruckus, and the man wasn't listening. Using soft words and people skills, me and my team managed to get him to first open the door. Once we succeededwith that, we didn't just rush in and arrest him, but spoke to him like a doting parent would.”

Avers the inspector, “It had a tremendous impact, we then took him to the police station, offered him tea, and then counselled him. With the result he was okay, we then called his relatives, who took him back. He t urned around and thanked us all. It was worth all the effort.” Once again Khaki proves that you don't need a sledgehammer to kill a fly!




## खाकीतले वीर !

लॉकडाऊनच्या काळात सी आर मोबाईलवर युटी असताना पहाटे पावणे पाच वाजता गुड मॉर्निग पॅट्रोलींग ड्युटीवर असताना एक अंदाजे ६० वर्षांचे गृहस्थ टिगंरेनगर येथील लेन १३ समोर उभे होते. त्यांना श्वसनाचा त्रास होत होता व त्यासाठी त्यांना हॉस्पीटलला जायचे होते. परंतु ऍम्ब्युलन्सला येण्यासाठी वेळ लागणार होता. त्यामुळे त्यांना विश्रांतवाडी पो.स्टेशनचे पोलीस नाईक अझरुद्दीन पठाण व कॉन्स्टेबल आनंद रासकर यांनी खाजगी गाडीने विनोद मेमोरियल हॉस्पीटल येथे उपचारासाठी आणले. त्यांना कोरोनाची लक्षणे असू शकतात असे डॉक्टरांनी सांगतल्यामुळे त्यांना १०८ ऍम्ब्युलन्स उपलब्ध करवून देऊन ससून हॉस्पिटलमध्ये पाठवण्यास मदत केली. ऐनवेळी खाकीतल्या या वीरांची मदत झाल्यानेच या व्यक्तीला जीवदान मिळाले.



Anand Raskar Azaruddin Pathan

# EARLY BIRDS TO THE RESCUE !

When Police Naik Azaruddin Pathan and his partner Police Constable Anand Raskar attached to the Vishrantwadi Police Station were on their rounds near lane No. 13 Tingre Nagar, they saw a man standing with another person on the road, waving frantically. Says Pathan, “On reaching there, I and Raskar saw the man gasping for breath, and that being one of the symptoms of Covid 19, got us really freaked out. Yet gathering courage we went up to him and asked his problem.”

“The man said he was having difficulty breathing and needed to go to a hospital, we were in our patrol car, and couldn't risk taking him, so we called an ambulance, “recalls Pathan. “The ambulance couldn't come immediately, so we requested that the man accompanying him take out his car, which he did, and Raskar drove him to a nearby hospital, where on checking he was told to go to Sassoon as they suspected Corona.”

“By the time, the ambulance had arrived and we sent him to Sassoon, but we were worried as in the melee we hadn't socially distanced ourselves, so I told Raskar to stay away from others and did the same for two days, till we heaved a collective sigh of relief, he had tested negative!”

Indeed, both Raskar and Pathan had put their lives on the line, like all Khaki warriors and helped a man in distress, who had just mismanaged his regular dose of medicine!




## पोलीसांनी घेतली ‘दोन जीवांची’ काळजी !

हडपसरच्या रामटेकडी येथे राहणाऱ्या सलमा अन्सारी. वय २७ वर्ष आणि ९ महिन्यांच्या गर्भवती. अशातच त्यांचे पती अचानक घर सोडून गेले. लॉकडाऊनमुळे कामधंदा तर नव्हताच त्यात दिवस भरत आलेले. ही बातमी वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक क्रांतिकुमार पाटील यांच्या कानावर आली. त्यांनी लगेच सलमा यांना बोलवून घेतले आणि आपले सहकारी स.पो.नि. विश्वजीत जगताप यांच्यासह त्या महिलेला मदत करण्याचे ठरविले. सलमा यांची आर्थिक परिस्थिती पाहून पाटील साहेबांनी त्यांची कोविडची टेस्ट ओळखीच्या डॉक्टरांकडून घेतली व सलमा यांचा ४,००० रूपयांचा खर्च वाचविला. एवढंच नव्हे तर त्यांनी सलमा यांना औषधोपचारांसाठी ५००० रूपयांची मदतही दिली. प्रसूतीसाठी त्यांचे नाव मंगळवार पेठेतील कमला नेहरू हॉस्पिटलमध्ये नोंदविले. हे सर्व कार्य पाटील साहेब व जगताप यांनी तातडीने केले. कारण इथं प्रश्न एकट्या सलमांचा नव्हता तर पोटातल्या बाळाची सुरक्षाही महत्वाची होती. आणि नागरिकांची सुरक्षा म्हटलं की पुणे पोलीस चार पावले पुढेच !



Vishwajit Kadam

# OFFLINE DELIVERY

When Sr PI Wanavdi Police Station Krantikumar Patil, got a call that a lady from his area was in trouble, he assigned API Vishwajit Jagtap to the job. Immediately Jagtap got cracking to find out that the lady was heavily pregnant and due for delivery. On talking to her, it came to light that her husband had left her about three months ago, and that she was running short of cash also. Says Jagtap, " She had registered herself to be admitted at the Command hospital, but due to Covid 19, only armed forces patients were allowed." This added to her woes, so Jagtap contacted an NGO he knew, who helped get her admitted to Kasturba Hospital, and not only that, Jagtap's efforts also bore fruit in the sense, that he even got her free treatment! Says he beaming with happiness, "She delivered some days ago, a baby girl, and both she and the child are doing very well. I thank the lord, and my senior sir, that they were present to help her as well as my team, who made all the necessary arrangements." It was a special, offline delivery, that was extremely well handled by the men in khaki.



## खाकी वर्दीतली 'प्रेमळ स्त्री' !

एके दिवशी येरवडा पोलीस स्टेशनचे पो.नि. शेख यांनी पो.उप. नि. शिवानी मगदूम यांना त्यांच्या केबिनमध्ये बोलावलं. एका तणावग्रस्त तरूण मुलीची केस होती. ही तरूणी मूळची कलकत्त्याची. बेंगळुरूमध्ये स्थायिक झालेली आणि लॉकडाऊनमुळे पुण्यात अडकलेली. तिचे पुण्यात कोणी नातेवाईक नाही. राहायचा पत्ता नाही. जवळचे पैसे संपत आलेले आणि त्यात हातावर क्वारंटाईनचा शिक्का...त्यामुळे ही मुलगी प्रचंड तणावात होती. शिवानी मॅडमनी त्या मुलीची परिस्थिती समजून घेतली. त्या एकट्या मुलीला निदान काही तरी मायेचा आसरा हवाच हा विचार त्यांच्या 'नात आला आणि त्यातूनच त्यांच्याच ओळखीतून त्यांनी कोथरूड'ध्ये मुलीच्या राहण्याची व्यवस्था केली. पण त्या मुलीचे काही तरी बिनसले आणि दुसर्याच दिवशी त्या मुलीचा शिवानी मॅडूमना फोन ''मला पुण्यात राहयचं नाही. बेंगळुरूला जायचं.'' जवळपास हट्टच तो. पण शिवानी मॅडमनी परिस्थितीचं गांभीर्य राखत संयम राखला. अगदी शांतपणे तिच्याशी बोलल्या आणि तिचा हट्टही मान्य केला. तिला बेंगळुरूला पाठविण्याची व्यवस्था केली आणि गाडीत बसल्यावर खर्चासाठी पैसेही दिले. या कार्याबद्दल शिवानी मॅडम एवढंच म्हणतात की, मी माझी ड्यूटी केली. जो कोणी संकटात आहे, त्यांच्या मदतीसाठी पोलीस आहे. शिवानी मॅडमचे हे शब्द पोलीस दलासाठी अभिमानाचे आहेतच. पण त्याचबरोबर खाकी वर्दीत दडलेली ही 'प्रेमळ स्त्री' देखील तितकीच कौतुकास्पद आहे.


PSI Shivangi Magdum

# LADIES SPECIAL !

When PSI Shivangi Magdum was told by her Sr PI Shaikh, at Yerwada Police Station, that he had received a call from a distressed girl originally from Kolkata, but settled in Bengaluru who had come to Pune for a job, but was caught in the lockdown, Magdum swung into action. She contacted the girl, and found that she had no place to go, stay and had run out of cash as well and she also had a quarantine stamp on her hand that made things even tougher for her. Recollects Magdum, I got her into a Paying Guest accommodation with someone I knew in Kothrud." However, as things turned out, she didn't want to stay in Pune, and contacted Magdum again the very next day. Once again, very coolly and calmly Magdum arranged for her return to Bengaluru, and even gave her some cash. Looking back she says, "I don't think I did anything special, I was just following my Sir's orders, and helping someone in distress, which is what the Police are there for in the first place." Well said and appreciated, but again, it was a Ladies Special from the women in Khaki!

‘‘ प्रत्येक जण जातिपातीच्या गुणाकाराने रंगला जात असताना खाकीने मात्र कधीच जात–पात–धर्म–रंग कशाचीही पर्वा न करता सगळ्यांना समावून कायम शांतता अमर्याद व अमर ठेवली आहे. ’’

**एन. एम. बागवान**
**स.पो. फौज डी कंपनी मुख्यालय**

---

‘‘ कर्तव्यदक्षता आमच्या रक्तात स्वाभिमान आमचा वर्दीत देशसेवेला समर्पित आम्ही स्वार्थी दुनियेच्या गर्दीत. ’’

**अनिरूद्ध हरिभाऊ जायभाय**
**पो.ना. २६२३ चंदननगर पोलिस, पुणे शहर**

▶ ‘‘ शांतता व सुव्यवस्था निर्माण करून जनतेच्या मनामध्ये निर्भयतेचे वातावरण निर्माणकरतो, तेव्हा पोलिसांचे जनतेप्रती कर्तव्य केल्याचे समाधान मिळते. ’’

**कृष्णा विष्णू इंदलकर**
**पो. नि. चंदननगर पोलिस स्टेशन, पुणे**

---

▶ ‘‘ पोलीस समाजात एक शासनाचा सेवक म्हणून डॉक्टर, वकील, शिक्षक खिलाडू वृत्ती कोणत्याही प्रसंगी कायदा व सुव्यवस्था कायम राखणारा अव्वल खेळाडू जो कधीही हार मानत नाही. ’’

**डी.डी. वाडेकर**
**म.पो.शि. १०९९७, स्वारगेट पोलीस स्टेशन**




## वर्दीतील श्रावण बाळ !

एका चौकात कोणा वयस्कर महिलेची तब्येत बिघडली असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक सुशील बोबडे यांना मिळाली. ते बीट मार्शलसोबत दुचाकीवर लगेचच तेथे पोहोचले. एक सत्तरीतली वृद्धा वेदनेने विव्हळत होती. तिच्याकडे मोबाईलही नव्हता आणि तिच्या मुलीचानंबरसुद्धा तिला आठवत नव्हता. बोबडे म्हणतात की मला खूप चिंता वाटली. तितक्यात आपल्या घरचे रेशन घेऊन जाणारा एक रिक्षावाला मला दिसला. मी त्याला थांबवून त्या महिलेला कमला नेहरू रुग्णालयात घेऊन जाण्यास सांगितले. पण सुरु असलेल्या कोरोनाच्या हाहाकारामुळे तो उत्सुक नव्हता. त्याला मला विस्तारानं समजवावं लागलं.

बोबडेंनी त्याचे पैसे देऊ केले, ग्लोव्ज घातले, त्या महिलेला त्यांच्याकडील एक्स्ट्रा मास्क दिला आणि तिला रुग्णालयात पाठवले. त्यांची समयसूचकता आणि सहृदयी कृत्यामुळे त्या वृद्ध महिलेला वेळेत उपचार मिळाले.


API Shushil Bobade

# REACHING OUT !

When API Shushil Bobade got a call telling him that a elderly lady was unwell in the chowk ahead ,he rushed on his two wheeler with his beat marshal . On reaching there he found a seventy year old lady in pain and saying that she did not have a mobile nor could she recollect the number of her daughter.

Says he, "I got worried and then suddenly I saw an auto carrying his own household rations . I hailed him and requested him to take her to Kamla Nehru Hospital. He was scared, and it took me a good five minutes of pleading to convince him."

Bobade then paid him, donned gloves and gave the lady an extra mask that he had, helped her in and had her dropped.

Goes to show how a generous soul and presence of mind can help. Way to go khaki!




## प्रकाश आपुलकीचा !

वानवडी पोलीस स्टेशनच्या अश्विनी माळी या रेशन दुकानात होणाऱ्या गर्दीच्या नियंत्रणाच्या ड्युटीवर होत्या. हे दुकान अंध व्यक्तींचे निवास व शाळेजवळ असल्याने बऱ्याच अंध व्यक्ती दुकानात येत असत. आपल्या कर्तव्याच्या पलीकडे जाऊन माळी यांनी त्यांना मदत करण्यास सुरुवात केली. त्या त्यांना रांगेत उभे राहण्यास तसेच रेशन घेण्यात साह्य करत तसेच त्यांना योग्य पद्धतीने मास्क लावण्याबाबत सांगत. काही विशेष केल्याचा अजिबात भाव त्यांच्या बोलण्यात नव्हता. मला हे सुद्धाकर्तव्यच वाटलं म्हणून मी केलं असं त्या म्हणतात. अश्विनी माळी यांनी अंध व्यक्तीच्या जीवनात आपलेपणाचा, स्नेहाचा प्रकाश पसरवला व खाकीतील माणसाचे पुन्हा एकदा दर्शन घडवले.



Ashwini Mali

# EYES FOR THE BLIND !

LPN Ashwini Mali attached to Wanavdi Police Station, was on duty near a ration shop to control crowds during ration distribution. She recalls, "It was near a blind persons' home and school, so I saw a number of blind people collecting for rations." Going beyond the call of duty Ashwini started helping them not only by taking them to the queue spots but educating them on how to tie masks and even helping them get their rations. Shyly she admits," I did this because I felt it was my duty and not for any publicity." A job well done Mali, you have tended to the garden of visually challenged people, and showered them with affection. A job well done in keeping with the khaki traditions.



## खाकीतले पुण्यकर्म !

सुरेश पवार हे गृहस्थ ३ महिन्यांपासून रास्ता पेठेत शांताई हॉटेलजवळील फुटपाथवर आपल्या अडीच वर्षांच्या मुलासोबत राहत होते. या दोघांचे दुर्दैव म्हणजे या लहानग्याच्या आईने फुटपाथवरच प्राण सोडले होते. पत्नीच्या पश्चात आपल्या मुलाची कशीबशी काळजी घेत सुरेश पवारांचा संघर्ष सुरु होता. त्यात लोकडाऊनमुळे उपासमार होऊ लागली. आपली ही व्यथा त्यांनी गस्तीवरील पोलीस नाईक सुनील घाडगे आणि रिकी भिसे यांना ऐकवली. आणि आपल्या या मुलास एखाद्या आश्रमात ठेवता येईल का अशी विचारणा केली. त्यांच्या विनंतीवर लगेच कृती करत भारत समाज सेवा केंद्र, कोरेगाव पार्क या संस्थेची माहिती या दोघांनी मिळवली. तेथे मुलांचे संगोपन व शिक्षण उत्तमप्रकारे होते याची खात्री केली. आणि मगच मुलाच्या वडिलांच्या संमतीने कायदेशीर बाबी पूर्ण करून या लहान मुलाला, सुधीरला तिथे दाखल केले. पो.नाईक श्री घाडगे यांनी सत्त्वर लक्ष घातल्याने रस्त्यावर आलेल्या एका लहानग्याचे आयुष्य मार्गी लागले.



PN Sunil Ghadge

# FUTURE SECURED !

When Police Naik Sunil Ghadge attached to the Samarth Police Station used to reach hos office for duty, he used to see a couple and their two and a half year old kid kn the footpath near hotel Shantai.

Three months ago,the mother of the child passed away on the footpath and Ghadge and his associates ensured a decent cremation ."However, says Ghadge the man and the kid continued to be on the footpath.I was really concerned about the child and his future."

Finally unable to take it any longer,Ghadge got the kid admitted in an orphanage at Koregaon Park.

Says he" At least now the father is able to go to work daily, as a labourer, without worrying about the kid."

Indeed this great act on part of Ghadge has secured the child's future! Well done color khaki once again.




## वेळेत मदत !

श्री खडक पोलीस स्टेशनचे पो.उपनिरीक्षक विक्रम मिसाळ, हवालदार बारवकर, पो.शिपाई भोसले हे पेट्रोलिंग ड्युटीवर असताना घसेटी पुलाजवळ त्यांना एक ज्येष्ठ महिला-संगीत परदेशी त्यांच्या गरोदर सुनेसह थांबलेल्या दिसल्या, जिला प्रसववेदना होत होत्या. परंतु लॉकडाऊनमुळे रिक्षा किंवा इतर वाहन मिळत नव्हते. ही अडचण त्यांनी पो.उ.नि.मिसाळ यांना सांगताच श्री. मिसाळ यांनी तत्काळ खडक पोलीस ठाणे येथील वन मोबाईल गाडी मागवून घेतली व स्वतः चालकाबरोबर या गाडीतून सोबत जाऊन या गरोदर महिलेला ससून हॉस्पिटलमध्ये दाखल केले. कालांतराने या महिलेची सुखरूप प्रसूती होऊन तिला कन्यारत्न प्राप्त झाले. वेळेत केलेल्या या मदतीबद्दल या महिलेच्या सासूबाई संगीता परदेशी यांनी पोलिसांचे मनापासून आभार मानले. मिसाळ व त्यांच्या टीमने दाखवलेल्या समयसूचकतेमुळे या महिलेला वेळेत उपचार मिळू शकले.



PSI Vikram Misal

# HOME DELIVERY !

When PSI Vikram Misal in charge of Mithi Ganj police chowky was on his morning rounds with police naik Dhansing Kadam, they saw an old lady with a heavily pregnant young woman calling out to them."

Says Misal, " I asked them what was wrong, the lady said her daughter in law was due and her son unreachable as he had gone to work. They needed to get to a hospital as soon as possible. I then called the Mobile One van of the Pune City Police and had them taken to the hospital."

Next day they came to know that the lady had delivered a daughter. So once again the khaki magic managed to make a perfect home delivery!

‘‘ पोलिसांचा कठोरपणा हा सर्वतोपरी न्यात आहे; परंतु तो कठोरपणा हा सामाजिक नैतिक व वैधानिक मूल्यांना न जपणाऱ्या समाजकंटकांचा साठी आहे. ’’

**नितीन तुळशीराम जगताप**

**पोलीस हवालदार ५५६४ गुन्हे शाखा, पुणे शहर**

‘‘ समाजात फिरत असताना कर्तव्य बजावत असताना जेव्हा नागरिक म्हणतात की, खाकी वर्दीतले पोलीस आहे, म्हणून आज आम्ही सुरक्षित आहोत. काही जण म्हणतात की, तुम्ही आमच्यासाठी देवच आहात. हे शब्द ऐकून मनाला जो आनंद होतो तीच खरी पोहोच पावती असते. ’’

**संजय मल्हारी रसाळे**

**पो. हवा १४६८, सिंहगड रोड, पोलीस स्टेशन**

▶ '' खाकी शब्दात एवढी प्रचंड ताकत ऊर्जा सामावलेली आहे की समाजातील सर्व रंजल्यागांजल्यांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचे भाग्य त्याला लाभले. ''

**राहुल दिलीप कादबाने**
**पोलीस नाईक ७४१६, गुन्हे शाखा, पुणे शहर**

---

▶ '' रणांगणात ही नेहमी असतो आम्ही सतर्क, दुश्मनही लावू शकत नाही आमच्या योजनेला तर्क निशाण आमच्या समोर आणि सलामी शस्त्र नजर दिपवून टाकते अंगावरती वस्त्र तिन्ही लोकी झेंडा आमचा अन् मान असते ताठ नोकरी खडतर आहे ही संकटाची असते गाठ. ''

**कोलते**
**पोलीस हवालदार २५२, वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**



## वेळेवर जीवनदायी मदत !

रमीझ मुल्ला आणि आनंद धनगर हे पोलीस कर्मचारी कोंढव्यातील आशीर्वाद चौकात नाकाबंदीवर असताना रात्री दीड वाजता एक गरोदर महिला व तिचे पती तिथून जाताना आढळले. महिलेला त्रास होत होता परंतु लोकडाऊनमुळे वाहन मिळतनव्हते. त्यांची स्थिती बघून या पोलिसांनी एक चार चाकी वाहन थांबवून त्यातून या दाम्पत्याला इनामदार हॉस्पिटल मध्ये नेण्याची व्यवस्था केली. या मदतीमुळे सदर महिलेला वेळेत उपचार मिळू शकले.


PC Rameej Raja Anand Dhanagar

# TAKING THE TROUBLE !

When Police Constables Rameej Raja and Anand Dhanagar attached to the Kondhwa police station were doing nakabandi, they came across a very harried and harassed family. Recounts Raja, “They were asking us, how do they get to the cantonment hospital, and this was in lockdown No.1. The lady was heavily pregnant, and in some pain, so I made them sit, offered them water, and then started calling ambulances. No one responded, since they were four people, husband, wife, and two kids, I couldn't take them on the two-wheeler.”

“Finally, me and my partner Anand, recalls Raja, halted an Emergency Vehicle and requested the driver to drop them, we took his number, and then helped the family board up.”

He dropped them and called up Raja that they had reached safely, which is when both he and Anand heaved a sigh of relief. A job well done. Once again color Khaki to the fore.



## खाकी आणि माणुसकी !

लॉकडाऊनच्या काळात कोंढव्यात राहणाऱ्या एक ८० वर्षाच्या आजी आजारी पडल्या. घरात त्यांच्या सोबत ८५ वर्षांचे पती. आजींना तब्येतीपेक्षाही पतीच्या जेवणाची काळजी. अशा वेळी आजींनी पोलीसांना फोन करण्याचा योग्य निर्णय घेतला आणि कोंढवा पोलीस स्टेशनचा फोन खणखणला. वरिष्ठ पो.नि. विनायक गायकवाड यांना आजींचे आजोबांवरील प्रेम आणि व्यथा कळाली आणि त्याच बरोबर परिस्थितीचे गांभीर्यही ! त्यांनी लगेच जेवणाच्या डब्याची व्यवस्था केली. पण दुसऱ्याच आजींचा फोन आम्ही जैन आहोत, उपाशी मरू पण कांदा–लसूण खाणार नाही.

दुसरं कोणी असतं तर त्यांचा नाद सोडून दिला असता पण सेवाव्रत हे गायकवाडांच्या रक्तातच आहे. त्यामुळे त्यांनी तो हट्टही मान्य करत जैन डबा चालू केला. त्या आजी–आजोबांचे आनंदी चेहरे पाहून गायकवाडही भरून पावले. हीच तर माणुसकीजी खाकीला लढण्याचे बळ देते.


Sr PI Vinayak Gaikwad

# JAIN JEVAN !

When Sr PI Kondhwa Police Station Vinayak Gaikwad received a frantical from an eighty year old lady residing at a building with her eighty five year old husband that she is unwell and has no means to cook for her husband he and his team rushed there. Szes he could make out that they were going through tough times. The tiszthing we did was range tractor and medicine. Then lananged for food for them Little knowing that they were Jains the tood contained both garlic and onions.

So mebody called himenety and said they would rather die man eat the food.

while others would have given up he managed to get them a jain twice a day! Says he, "Giving up is not in my DNA. And the wonderful blessings and happiness that came from the couple was one of the biggest rewards of my life. Once again to the rescue.



## फाईव्ह मॅन आर्मी !

कोविड १९ च्या महामारीने पोलीस दलातही शिरकाव केला. यातली पहिली केस ही आपल्याच पोलीस स्टेशनची आहे हे जेव्हा फरासखान्यातले वरिष्ठ पो.नि. जगनाथ काळस्कर यांना समजले तेव्हा त्यांनी ताबडतोब आपल्या १२७ सहकाऱ्यांना क्वारंटाईन केले.

पोलीसांची काळजी घेतली पण जनतेचं काय? हा प्रश्न काळस्करांना पडला. तेव्हा झोन १ च्या उपायुक्त श्रीमती सपना गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी फरासखान्याजवळच्याच एका खोलीत आपलं सॅनिटाईज केलेलं ऑफिस सुरू केलं. इथूनच पुण्यातल्या पेठ भागातील पेट्रोलिंग सुरू केलं. कारण स्वतःपेक्षा त्यांना नागरिकांची सुरक्षा महत्वाची वाटली.

सपना मॅडमच्या साथीने श्री. जगन्नाथ काळस्कर यांच्या अवघ्या ५ जणांच्या टीमने पुण्यातल्या पेठांची काळजी घेतली. जीवावर उदार होऊन जनतेच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरलेली ही 'फाईव्ह मॅन आर्मी' म्हणजे पोलीस दलाचे प्रतीकच आहे.


Sr PI Jagganath Kalaskar

# HOLDING FORT !

When Sr Pi Faraskhana Police Station, Jagganath Kalaskar discovered that the first case of Covid 19 among the Pune City Police came from his police station more than 127 staff had to be quarantined Undaunted by the setback, Kalaskar under the guidance of Ms Sapna Gore DCP Zone 1, set up office in a sanitized room adjacent to the police station and continued patrolling the highly contaminated peth areas What made him do that ?

It was a time when the janta needed us most . That is when I did want to turn my back on them . We ran the police station with a skeleton staff of about five people and only DCP macam uses to help us out by regularly coming for visits What Kalaskar and his colleagues and DCP Zone I did takes extraordinary guts But the Khaki has once again proven it they have in abundance what it takes.



# तातडीच्या क्षणी... पोलीसांची हजेरी !

विश्रामबाग पो.स्टेशनचे पो.उप.नि. विजय जाधव लॉकडाऊनच्या काळात मंगळवार पेठेत राऊंडवर होते. कमला नेहरू हॉस्पिटलच्या समोर त्यांना एक महिला तणावात दिसली. साहजिकच जाधव यांनी तिची विचारपूस केली. ती एक घरकाम करणारी स्त्री होती आणि कमला नेहरू हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी तिला नायडू हॉस्पिटलमध्ये जायला सांगितले होते.

अर्थात कोविडची लक्षणं तिच्यामध्ये दिसत होती आणि ती एकटीच चालत चालत नायडूमध्ये चालली होती. त्यासाठी तिने जाधवांना नायडूचा पत्ताही विचारला. पण तिची अवस्था अशी होती की कोणत्याही क्षणी ती बेशुध्द पडेल. हे सगळं पाहून परिस्थितीचं गांभीर्य जाधव यांनी ओळखलं. तेवढ्यात कर्मधर्म संयोगाने तिथून जाणार्या एका ॲम्ब्युलन्सला जाधवांनी थांबविला. ॲम्ब्युलन्सचा चालक दुपारचे जेवण करून ड्युटीवर निघाला होता.

त्याच ॲम्ब्युलन्समधून तिला वेळीच नायडू हॉस्पिटलमध्ये नेले. आणि मग थोड्या वेळाने सर्व अधिकारी व कर्मचारी असा फौजफाटा तिच्या देखभालीसाठी तिथे दाखल झाला. पण...जाधव यांनी तातडीच्या क्षणी केलेली ही हालचाल त्या 'हिलेला आणि इतरांना सुरक्षित ठेवणारी ठरली.

# CALL KHAKI FOR EMERGENCY !



PSI Vijay Jadhav

When PSI Vijay Jadhav, attached to the Vishrambaug Police Station was on duty patrolling the Kamala Nehru Chowk area opposite the Kamala Nehru hospital, he was approached by a lady in distress. Says he,

" She told me that she was a maid servant in Pune , and hardly knew the rioas etc, and that the doctors had asked her to go to Naidu hospital as she was displaying symptoms of Covid 19, and asked for directions.

She said she would go there walking . Seeing her condition, I could sense she was about to faint. First, we offered her water and secondly,as luck would have it an ambulance was passing by.

" Jadhav stopped the ambulance and requested the driver who was off to lunch . to drop her off at Naidu. " After much persuasion, recalls Jadhav, he relented and in the meantime a lot of senior officers and other staff had also gathered, so all of us ensured that she reached Naidu safely.

" Indeed, it's become the nom these days just call Khaki for emergency !

▶ ‘‘ खरंच खूप छान वाटते लहाने मुले आम्हाला ‘पोलिसकाका’ म्हणून हाक मारतात. ’’

**संजयकुमार सुर्यकांत दळवी**
**पोलीस शिपाई ९१३६, गुन्हे शाखा, पुणे शहर**

---

▶ ‘‘ जेव्हा जेव्हा आपली कार्यक्षमता पोलिसदलाला सिद्ध करण्याची वेळ आली, तेव्हा तेव्हा पोलिसांनी आपली कर्तबगारी दाखवून स्वतःला सिद्ध करून दाखवलं. ’’

**संदेश हनुमंत शिवणे**
**पो. ना. १७९, विमानतळ पोलिस स्टेशन, पुणे शहर**

‘‘ कर्तव्यभावनेने मनापासून केलेले काम हे मनाला वेगळ्या प्रकारचा आनंद देऊन जाते, जे कोणी पैशाने, संपत्तीने खरेदी करू शकत नाही आणि ते काम पोलिस करतात. ’’

**एस.आर. जाधव**
**पो.शि. १०५१९, विमानतळ पोलिस स्टेशन, पुणे शहर**

‘‘ महाराष्ट्राचा पोलीस मी, हा महाराष्ट्र माझा या राज्यातील मी रक्षणकरता, हा अभिमान माझा. ’’

**बी.एस. इंगळे**
**पो.शि. ७०६०, विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे शहर**



## रक्ताचा 'प्लॅन बी'!

वानवडीच्या गुन्हे शाखेचे पो.नि. सलीम चाऊस यांनी आपल्या हद्दीतल्या लोकांसाठी आणि कोविड योध्दयांसाठी एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला. ज्यातून वानवडी परिसरातल्या सगळ्या घडामोडी एकमेकांना कळू लागल्या. लॉकडाऊन १ नंतरच्या काळात सलीम यांना कळालं की, पुण्यातील रक्तपेढ्या व हॉस्पिटल्समध्ये रक्ताची कमतरता आहे. लगेच आपण काय करू शकतो? या विचारातून त्यांना रक्तदान शिबीर घ्यावं असं सुचलं आणि ही कल्पना त्यांनी आपल्या व्हॉट्सॲप ग्रुपवर मांडली. या कल्पनेला ग्रुपच्या सदस्यांनीही भरभरून प्रतिसाद दिला. आणि वानवडीच्या जांभूळकर उद्यानात रक्तदान शिबीर घ्यायचं ठरलं.

पण...रक्तदाते आणि तंत्रज्ञ दोघंही उद्यानात यायला धजावेनात. आता करायचं काय आणि मागे हटतील ते पोलीस कसले? सलीम यांनी लगेच 'प्लॅन बी' अंमलात आणला. तंत्रज्ञांना सोबत घेऊन सलीम स्वतः त्या भागातील सोसायट्यांमध्ये गेले. तिथे मात्र रहिवाश्यांना चांगला प्रतिसाद दिला आणि तब्बल २९० रक्ताच्या बाटल्या जमा झाल्या.

पो.नि. सलीम यांच्या या कार्यामुळे 'पुणे टाइम्स' या वतमानपत्राने त्यांची बातमी छापून गौरव केला. नंतर अनेक स्वयंसेवी संस्था व प्रतिष्ठान यांच्याद्वारेही सलीम यांच्या या 'प्लॅन बी' ला सन्मानित करण्यात आले.



PI Salim Chaus

# BARD OF BLOOD !

PI Salim Chaus, attached to the crime unit of Wanavdi Police Station, had formed a what's group of people from the neighborhood dubbed Covid Warriors. One fine day, post the easing of (Lockdown) he felt that there was an urgent need of blood in blood banks and hospitals, so he got the group activated and received fantastic response to his idea Says Ghaus. " We had organized the camp in Jambulkar Garden, but people and technicians were afraid of stepping out, so we moved it to individual societies, and there too we got a phenomenally good re sponse. Police Times also honored me with a certificate of achieve ment .

" More than 290 people responded to Chaus's call and NGO's and pra thisthans also honored Chuus for his initiative.

Yes, the bard of blood had played his tune and the people lelt the bent of Khaki once again.



# लॉकडाऊनध्ये पोलीसांचीही 'परीक्षा' !

गुन्हे शाखेच्या महिला विभागाच्या सहा.पो.नि. स्वाती केदार-खाडे या आपली नियमित ड्यूटी करत होत्या. लाकडाऊनच्या काळात पोलीस उपायुक्त श्री. बच्चन सिंह यांनी सुरू केलेल्या 'डिजीटल पासेस' ची जबाबदारीही त्यांच्याकडे होती. आपले काम करत असतानाच स्वाती मॅडमच्या समोर एक महिला उभी राहिली. तिच्या हातात साधारण ५-६ महिन्यांचे बाळ होते. ती अतिशय भेदरलेल्या अवस्थेत होती. स्वाती मॅडमनी तिला शांत करून बोलतं केलं.

सिंहगड रोडवर राहणाऱ्या या महिलेला लोकडाऊनच्या काळात तिच्या नवऱ्याने बाळासह घराबाहेर काढलं होतं. आणि आता तिला आपल्या माहेरी नागपूरला जायचे होते. तिच्या आईवडिलांनी कारचीही व्यवस्था केली होती. पण प्रश्न होता पासचा. मग पोलीसांच्या नियमाप्रमाणे तिच्या पतीला बोलावून घेण्यात आलं.

पण नवऱ्याने तिथेही तिला घरात घेण्यास स्पष्ट नकार दिला. स्वाती मॅडमना पोलीसी खाक्या दाखवता आला असता पण इथे परिस्थिती नाजूक होती. महिलेसोबत तिचे ५ महिन्याचे बाळ होते आणि तिला नवऱ्याबदल कुठलीही तक्रार करायची नव्हती. रूजवात करून महिलेला परत पाठविणेही धोक्याचे आणि महिलेला एकटे सोडणेही जीवावर बेतले असते. कारण तिने आत्महत्या केली तर?

हा क्षण परीक्षेचाच होता. पण स्वाती मॅडमनी योग्य निर्णय घेतला आणि त्या महिलेला पास दिला. एवढंच नव्हे तर त्याचे सरकारी पो.उप.नि.शेख यांनी स्वतः त्या महिलेला आणि तिच्या बाळाला, त्या महिलेच्या पालकांनी ठरविलेल्या कारमध्ये बसवून दिलं आणि स्वाती मॅडमनी सुटकेचा निश्वास सोडला .


API Swati Kedar - Khade

# ALL ROUND HELP !

What API Swati Kedar - Khade looking after the women's cell at the Crime Branch, thought would be a normal day at work during lockdown 1 turned out to be a bit extraordinary. She was simultaneously working on issuing digital passes, an initiative of Crime Branch DCP Bachchan Singh. Recalls Swati,

" A woman came to me with a five-month-old baby. She was crying, and wanted to go Nagpur to her mother's house as her husband had deserted her, he was from Sinhgadh Road, and her mom had even booked a car for her.

However, she had no pass. " But naturally, as per protocol, Swati wanted to call her husband and counsel him , but when she touched base, he said I don't want her. In the lockdown period, she couldn't take the risk of the lady taking an extreme step like suicide. Recalls Swati.

" She didn't want to press charges, and she also didn't want to go the local police station, so myself and PSI Shaikh who was helping me, quietened her, arranged for a pass and sent her to Nagpur in a private vehicle that her parents had arranged for her. " Once again, Khaki had provided all round help, in time and saved a certain catastrophe.



## हातावरचं पोट आणि आभाळाचे छप्पर !

लॉकहाऊनमुळे हातावर पोट असणाऱ्या कानगारांची परिस्थिती बिकट झाली होती. विश्रांतवाडी पोलीस स्टेशनच्या स्पेशल ब्रँचचे हेड कॉन्स्टेबल नूरअहमद पाटील हे एकदा गस्तीवर असताना त्यांना एका बंद हॉटेलच्या बाहेर बसलेले दोन कामगार दिसले. विचारपूस करता, ते त्याच हॉटेलमध्ये काम करायचे असे कळले. पण हॉटेल बंद झाले आणि दोघांचे कामही गेले. रहायला छप्पर नाही आणि पोटातही काही नाही अशी त्यांची अवस्था पाहून नूरअहमद यांनी त्यांना मदत करायचे ठरवले. त्या हॉटेलचे मालक पाटलांच्या ओळखीचे होते. त्यांनी लगेच फोन करून मालकाला हॉटेल उघडायला लावले आणि त्या दोघांना भरपेट खाऊ घातले. तसेच त्याच हॉटेलवाल्याच्या मदतीने त्यांच्या निवाऱ्याचीही सोय करून दिली. पण पाटील एवढ्यावरच थांबले नाही तर लॉकडाऊनच्या संपूर्ण काळात त्या दोघांना रेशन मिळेल अशी व्यवस्था त्यांनी कान दिली. काही दिवसांनी त्या हॉटेलने पार्सल सेवा सुरू केली आणि या दोघांनाही पुन्हा काम मिळाले. पण या मधल्या काळात जेव्हा त्यांच्या सोबत कोणी नव्हते तेव्हा पुणे पोलीस त्यांना आधार देण्यासाठी उभे होते .



Nurahamad Patil

# HOMING IN !

Khaki clad cops of the city have made it a habit of helping out and now even the special branch ones in mufti are doing it. HC Nurahamad Patil, attached to the special branch Vishrantwadi Police station was on his rounds in the area when he spotted two laborers sitting outside a shuttered restaurant.

Says Patil, " On inquiring I came to know that they had no place to stay and no food to eat. Fortunately, I had the number of the restaurant owner, called him up immediately and told him to open the shutters and give them a place to stay, which he did.

" Further Patil ensured that both got their rations, till the lockdown eased from him, and now says he, "The restaurant has opened for take away and they got their job back.!" All's well that ends well. Job well done, even in mufti, the heart's always Khaki !



## गोल्डन ज्युबिली सेलिब्रेशन !

लॉकडाऊनच्या काळात पोलीस केवळ सुरक्षा पाहात नव्हते तर अनेक परिवारांचे सदस्य होऊन त्यांची काळजी घेत होते. ॲमेनोरा टाऊनशिपमधील एका जोडप्याची 'गोल्डन ज्युबिली ॲनिव्हर्सरी' आहे हे जेव्हा हडपसर पोलीस स्टेशनमध्ये कळालं तेव्हा त्यांनी हा 'सुवर्णक्षण' साजरा करण्याचे ठरवले.

त्यासाठी हे.कॉ. तानाजी देशमुख आणि त्यांचे सहकारी पो.कॉ. नितिन चौधरी हे पुढे झाले आणि त्यांनी केक, पुष्पगुच्छ अशी सगळी तयारी केली. या जोडप्याचं वय लक्षात घेता, त्यांना बाल्कनीत बोलावून सेलिब्रेशन करण्याचं पोलीसांनी रद्द केलं. त्यानुसार केक, गुच्छ वगैरे घरी पोहचविण्यात आले आणि स्वतः तानाजी देशमुख इतर शेजाऱ्यांसह सोशल डिस्टन्स पाळून खालीच उभे राहिले व या जोडप्याला टाळ्या वाजवून त्यांना शुभेच्छा दिल्या.

लग्नाचा ५० वा वाढदिवस लॉकडाऊनमध्ये साजरा झाला तो केवळ पोलीसांमुळेच ! आणि तानाजी देशमुखांचं म्हणाल तर... या जोडप्याच्या चेहऱ्यावरचा आनंद... हे त्यांच्यासाठी अविस्मरणीय असं 'रिटर्न गिफ्ट' ठरलं .



HC Tanaji Deshmukh PC Nitin Chaudhari

# GOLDEN JUBILEE HIT !

In the golden days of cinema when a film ran for fifty weeks, it was a Golden Jubilee . and even now when couples celebrate their 50th Wedding Anniversary, its called Golden Jubilee.

During Lockdown 1. a couple in Amanora Township was doing just that when the Hadapsar Police Station got wind of it , so they arranged a cake and flowers, and HC Tanaji Deshmukh with his colleagues including PC Nitin Chaudhari went to deliver it . The original plan being to call them in the balcony, which was nixed because of their seniority. " The couple was really overjoyed recalls Tanaji and they shared the moments with their kids on the laptop through video Unfortunately we couldn't be present upthere , so along with other residents, we clapped and made merry with proper social distancing from below !" Says he. " It was one of the most gratifying experiences of my life and I can never forget the sound of happiness in their ce when the couple thanked us Who says Khaki is just work it's play too and celebration as well.

‘‘ सलाम त्या कर्तव्यनिष्ठेला जो दंगलीध्ये स्वतःचे घर सोडून समाजामध्ये पेटलेली घरे विजवण्यासाठी जातो. ’’

**बाळासाहेब कोल्हे**
**पो.शि. १०९०६, विमानतळ पोलिस स्टेशन, पुणे शहर**

---

‘‘ देशासाठी पोलिसांचे बलिदान पाहिले मी, समाजकंटकांवर तो शिरजोर असतो, सुपुत्र खरा मातृभूमीचा थोर असतो, विनाकारण पोलीस कठोर नसतो. ’’

**बी.एस. इंगळे**
**पो.शि. ७०६०, विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे शहर**

“ रंग माझा खाकी, खाकी माझा स्वभाव झळकून जातील प्रेम माया शिस्तीचा त्यावर प्रभाव. ”

**अजित कुणे**
**पो.ना. ७७७, सायबर क्राईम, पुणे शहर**

---

“ हम पोलीसवालोंका अलग ही फसाना है तीर भी चलाना है और परिंदोंको भी बचाना है. ”

**भूषण शेलार**
**पो.शि. १०३२५ सायबर क्राईम, पुणे शहर**



# पेशंटसाठी पोलीसांनी केले 'ऑपरेशन' !

पोलीस उपायुक्त श्री. बच्चन सिंह यांच्या अखत्यारीत असलेल्या गुन्हे शाखेच्या काळजी विभागातील वा.पो.नि. शिल्पा चव्हाण यांना डॉ. पाटील यांचा फोन आला आणि चव्हाण मॅडमची लगबगीने सज्ज झाल्या. कारण ती वेळच तशी होती. लॉकडाऊन १ च्या काळात डॉ. पाटील यांच्या पुण्यातील एका पेशंटच्या मेंदूचे ऑपरेशन करायचे होते. पण लॉकडाऊनमुळे ते शक्य झाले नाही. आता आणखी उशीर नको म्हणून डॉक्टरांनी जयपूरच्या एका हॉस्पिटलमध्ये हे ऑपरेशन करायचे ठरवले आणि आता ताबडतोब पेशंटला एअर ॲम्ब्युलन्सने जयपूरला हलविणे भाग होते. इथे मुख्य अडचण होती ती घरापासून विमानतळावर पोहचण्याची. आणि त्यासाठी चव्हाण मॅडमनी सगळी सूत्रं हातात घेत, पेशंटची माहिती, कारचा क्रमांक इ . गोष्टी तातडीने मागवून घेतल्या आणि लगेच एक ई–पास त्यांच्या मोबाईलवर पाठवून दिला. एवढेच नव्हे तर पेशंटच्या कारसोबतच काही पोलीसही विमानतळापर्यंत रवाना करण्यात आले. कारण एकच ... त्या पेशंटसाठी प्रत्येक सेकंद महत्वाचा होता आणि पोलीस तपासणीत वेळ जाऊ नये म्हणून स्वतः चव्हाण मॅडमने है ऑपरेशनयशस्वी करून दाखविले .


WPI Shilpa Chavan

# OPERATION BRAINSTORM !

When WPI Shilpa Chavan, of the Care wing of the Crime Branch, headed by DCP Bachchan Singh, got a call from Dr Patil, not only was he worried, but got Chavan all worked up. Says she, "The doctor was sounding very desperate, and wanted immediate help, he had a patient in Pune, who was scheduled for a major brain surgery, and this during Lockdown 1, in Japipur. It was getting delayed, and finally they had made arrangements to shift the 43-year-old patient via air ambulance." The problem according to Chavan was, "Obtaining a pass to get from the patient's home to the airport without any hassles." Without batting an eyelid, she got the patient's details and the car number, as well as the number of people accompanying him. In a matter of minutes, she had the pass ready and sent on the patient's smartphone. Says she, "It was a relief to know that they reached the airport safely, got into the air ambulance, reached Jaipur and even had a very successful surgeryl" Operation Brainstorm was a success. Yet again, Chavan had seized the moment to make Khaki proud.

## पोलीसांची 'पोटभर' माया...!



वानवडी पो. स्टेशनचे पो. कॉ. दीपक भोईर यांच्याकडे बातमी आली की, त्यांच्याच हद्दीतील एका सोसायटीमधला तरूण प्रचंड तणावात आहे. ही बातमी समजल्यावर लगेच भोईर व त्यांचेसहकारी त्या तरूणाच्या घरी पोहचले. त्याची चौकशी केल्यावर कळलं की, आता तो घरात एकटाच आहे आणि त्याचे पालक मुंबईतल्या दवाखान्यात आहेत. या मुलाकडे पैसे तर नव्हतेच पण गेल्या २४ तासात त्याने काहीच खाल्ले नव्हेत आणि म्हणूनच तो प्रचंड तणावात होता. हे समजल्यावर भोईर व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या खिशातून पैसे काढत वर्गणी गोळा केली आणि त्याला दोन वेळचे जेवण दिले. तीन दिवसानंतर भोईर यांची रात्रपाळी सुरू होणार होती. आता या मुलाचं कसं होणार या विचाराने भोईर यांनी या मुलाला जेवण बनवता येतं का याची खात्री करून घेतली. मुलाला जेवण करता येत होतं म्हटल्यावर भोईर यांनी पुन्हा वर्गणी काढली आणि त्या मुलासाठी तेलामिठापासून १५ दिवसांचा किराणा भरून दिला. आईवडील जवळ नसताना त्यांच्या मुलाने काही वेडवाकडे पाऊल उचलू नये म्हणून पोलीसांनी उचललेल हे योग्य पाऊल... खरंच अभिमान आणि समाधान देणारं आहे .


Deepak Bhoir

# THOUGHT FOR FOOD !

Police Constable Deepak Bhoir attached to the Wanavdi police station received information about a young boy staying at Rajeha Woods being indistress. He and his colleagues rushed there during Lockdown 1.

Says he, "On reaching there, we came to understand that the young fellow's parents were hospitalized before the lockdown in Murmbai, and hence they couldn't send money or be in touch with him, which is wtry he was so desperate."

Adds Bhoir, "On further inquiry we came to know that he hadn't had food for the last twenty four hours, so we arranged food for him, and then I realised he had no money either, so we pooled some money and I used to feed him twice a day. After three days I realised I was getting into my night shift. So, we asked him if he could cook, and he said yes, so again we pooled money and gave him a fortnight's supply of food, pulses etc, to sustain him, till the time his parents got back!"

Now that's reversing an old English saying "food for thought" to "thought for food" the Khaki way!



## गायीच्या पोटाची पोलीसांनाही काळजी !

हडपसर पो.स्टेशनचे हे.कॉ. तानाजी देशमुख यांना स्पे.पो.ऑ. मुलानी आणि मोरे यांचा फोन आला. त्यांनी सांगितले की तुकाई टेकडीच्या परिसरात काही गायी चाऱ्यासाठी हिंडत आहेत. ही बातमी समजताच देशमुख आणि त्यांचे सहकारी पो. कॉ.नितीन चौधरी हे दोघेही मंडईत गेले आणि मंडईत पडलेल्या भाजीपाल्याच्या चाऱ्याची पोती भरली. वाटेतच काही मदतनीस नागरिकांना घेऊन ते सर्व तुकाई टेकडीवर गेले. तिथे काही चाऱ्यासाठी फिरणाऱ्या गायी त्यांना दिसल्या. त्या गायी खूप उपाशी असाव्यात कारण त्यांनी काही मिनिटातच त्यांनी तो चारा खाऊन टाकला. मग देशमुख आणि चौधरी यांनी स्वतः काही दिवस त्या गायींना भाजीपाला खाऊ घातला आणि नंतर तेथील मदतनीसांची भाजी मंडईतील व्यापाऱ्यांशी ओळख करून दिली. जेणेकरून गायींना नियमितपणे चारा मिळेल. पोलीस फक्त नागरिकांच्याच रक्षणासाठी नाहीत तर मुक्या प्राण्यांचेही राखणदार आहेत, हे देशमुख आणि चौधरी यांनी पुणेकरांना दाखवून दिले.



HC Tanaji Deshmukh PC Nitin Chaudhari

# FODDER TIME !

Fodder Time HC Tanaji Deshmukh attached to the Hadapsar Police Station got a call from SPO's Mulani and More that there were several cows going hungry at Tukai Tekdi due to unavailability of fodder. Not waiting a second, he and his mate PC Nitin Chaudhari went to the vegetable market and gathered as many bags of veggie leftovers as they could manage, grabbed a couple of volunteers on the way and charged up the hillock to find emaciated and weak cows who hadn't had a proper feed for several days. Recollects Tanaji, " They were really hungry, and ate all the vegetable waste fast, so we kept on doing the same routine for the next few days, and then organized volunteers from the area, and connected them to the vegetable dealers, so that they could feed the cows daily."For those in khaki who work tirelessly and don't even go home when the cows do, it was just another dayat work, but a very special one at that.



# ‘काळ’ आला पण पोलीसांनी ‘वेळ’ लांबवली. !

लॉकडाऊन १ च्या काळात विश्रांतवाडी पो.स्टेशनचे पो.ना. अजित टेंभेकर व पो. कॉ. सुशांत रणवरे हे दोघेजण टिंगरे नगरमध्ये गस्त घालत होते. तेवढ्यात त्यांना एका बंद दुकानाच्या बाहेर फुटपाथवर पडलेला एक माणूस दिसला. तो हालचाल करत नव्हता. आजूबाजूच्या कोणालाच त्याच्याबद्दल माहिती नव्हती. बरं, त्याला हात लावायचा तरी कसा? कोविड पॉझिटिव्ह असला तर? शेवटी त्यांनी आधी १०८ नंबर फिरवून ॲम्ब्युलन्स बोलावली आणि नंतर आपल्या सहकाऱ्यांना मदतही मागितली. नंतर मास्क, हातमोजे घालून टेंभेकर व त्यांच्या सहकार्यांनी त्याला हलवून पाहिले. त्याच्यात कोविडची लक्षणे तर दिसत नव्हती. मग त्याला उठून बसवले, पाणी पाजले. तोपर्यंत ॲम्ब्युलन्स आली आणि त्या माणसाला ससूनला घेऊन गेली. दुसऱ्या दिवशी त्या माणसाची चौकशी करण्यासाठी टेंभेकर ससूनला गेले. तेव्हां त्यांना कळलं की, हा गेल्या ३ दिवसांपासून त्या माणसाच्या पोटात अन्नाचा कणही नव्हता. तो जवळ जवळ मेल्यातच जमा होता. पण वेळेवर हॉस्पिटलमध्ये आल्याने त्याचे प्राण वाचू शकले. हे ऐकून टेंभेकरांना खूप समाधान वाटले. कारण काळ आला होता. पण टेंभेकर व रणवरेंनी वेळ येऊ दिली नाही.



PN Ajit Tembhekar PC Sushant Ranawre

# A LIFE SAVED !

When PN Ajit Tembhekar and Police Constable Shushant Ranawre of Vishrantwadi Police Station were patrolling the Tingre Nagar area, during lockdown 1, they came across a man lying on the street outside a storefront. Recollects Ajit. ” At first we were worried about approaching him, think that he could be Covid 19 positive, so we made inquiries, but no one was forthcoming. At our wit’s end we finally dialed 108 and got an ambulance. On its arrival, we called for help from my colleagues, donning masks and gloves we approached him, and found that he had no covid like symptoms. We gave him water, revived him and put him the ambulance and sent him to Sassoon Hospital for admission.”Once they had done it, the next day they called to check on him, to discover from the attending doctor, that he was negative, and he had passed out due to sheer starvation from not having had food for the last three days. Says Ajit, “The doctor categorically told me, that if we hadn’t sent him that time, he wouldn’t have survived. So it was a nice feeling that PC Ranawre and I and my colleagues had saved a life.”

▸ ‘‘ पोलिसांनी मोडले पुण्यातील गुन्हेगारीचे पाय, वाहन–चालक पुणेकरांच्या डोक्यावर हेल्मेटची शान, पुणेरी पाट्यांना दिला सी. पी. ऑफिस मध्ये मान, म्हणून सांगतो पोलीस माझी शान. ’’

**राहुल गणपती खंडागळे, पोलीस उप निरीक्षक**
**खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

▸ ‘‘ समाजाने पोलिसांच्या चारित्र्यावर कितीही टीका केल्या, तरी सशाजातील प्रत्येकाच्या चारित्र्य प्रमाणपत्र पोलीस देतो. ’’

**विजय झंजाड**
**पोलीस उप निरीक्षक युनिट ४, पुणे शाखा, पुणे शहर**

▶ ‘‘ जनतेच्या सहकार्याशिवाय हे यश संपादन करणे म्हणजे पाण्यावर रेष ओढण्यासारखे आहे. ’’

**विनायक बाळासो कोळी**
**स.पा.नि. खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

▶ ‘‘ असं म्हटलं जातं की जिथे विज्ञानाच्या हात टेकतात, तेथून खरे अध्यात्म सुरू होतं. गदी त्याचप्रमाणे जिथे सर्वसामान्यांचे प्रयत्न थांबतात, तेथे पोलिसांचे प्रयत्न सुरू असतात.’’

**विठ्ठल दत्तु कायगुडे**
**पो. शि. शिवाजीनगर पोलीस स्टेशन**



## पोलीसांचा 'सामोपचार'!

गुन्हे शाखेच्या ज्येष्ठ नागरिक विभागात काम करणाऱ्या वा.पो.नि. वैशाली चांदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या वा.पो.ना. पूनम बारसकर यांना हडपसरच्या एका ज्येष्ठ नागरिकाचा फोन आला. त्या ज्येष्ठ नागरिकांचा भाडेकरू त्यांना घरभाडे देत नव्हता, त्याने मेंटेनन्स व लाईटचे बिलही भरले नव्हते. साहजिकच ते काका निराश झाले होते आणि त्यांना आता पोलीसांची मदत हवी होती. पूनम मॅडमसाठी आता मात्र मोठा पेच निर्माण झाला होता. कारण लॉकडाऊनच्या काळात घरभाड्यासाठी भाडेकरूवर दवाब टाकणे चुकीचे आणि दुसरीकडे या काकांना धीर धरा असे सांगणेही योग्य नव्हते. शेवटी बारसकरांनी हा प्रश्न सामोपचाराने सोडविण्याचा निर्णय घेतला. चांदगुडे व बारसकर यांनी या दोघांसोबतही फोनवर एकत्रितपणे चर्चा केली. त्यातून दोघांनीही परस्पर सामंजस्यातून हा प्रश्न सोडवावा असं त्यांना सांगितलं. या दोन्हीही महिला पोलीसांनी अतिशय शांतपणे हे प्रकरण इतकं व्यवस्थित हाताळलं की, कुठलाही तंटा न करता, त्या माणसाने घरभाडे व इतर देणी भरली आणि तो ते घर सोडूनही गेला. पोलीसांच्या या सामोपचाराच्या भूमिकेने या ज्येष्ठ नागरिकाला खऱ्या अर्थाने आधार मिळाला.




# SETTING IT RIGHT !

Indeed, somethings can go horribly wrong, and those need to be set right. That is exactly what WPN Poonam Baraskar did under the deft guidance of WPI Vaishali Chandgude of the Senior Citizen's Cell at the Crime Branch.

Says Poonam, " I got a call from a senior citizen staying in Hadapsar, he was all worked up about the fact that his flat, which he had rented out to a family, hadn't paid him the rent for months, they had not cleared either the society or the electricity bills."This was one tough call, as they couldn't evict the person as it was during the lockdown, nor could they ask the senior citizen to hold on immediately. Says Poonam, "We counselled them on a conference call, and made each understand the other's difficulty."Both Chandgude and Baraskar have a soft approach and are very good with their manners, so both sides were convinced and says Poonam, "Not only did the person on rent vacate the premises, but paid all electricity bills, maintenance charges and the rent due! The senior citizen who had approached us was over the moon." So here is what the women in Khaki did, they talked the walk!



## शौर्याची संकटावर मात!

विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक श्री. विठ्ठल खिलारे १ मे रोजी शनिपार चौकाजवळ ड्युटीवर होते. त्या दिवशी अचानक जोराचा वारा येऊन बादळी पाऊसही झाला. या वाऱ्यामुळे पोलिसांच्या संरक्षणासाठी लावलेला तंबू उडून जात असताना जीवावर उदार होऊन तुफानी पावसात तो तंबू पेलला व फाटण्यापासून व उडून जाण्यापासून वाचवला. अनेक पोलीस व मान्यवर नागरिकांनी सोशल मीडियावर या कामगिरीचा व्हिडिओ प्रसिद्ध केला.

### २. देवमाणूस

भारती विद्यापीठ परिसरात राहणाऱ्या एक पेन्शनर नागरिकांकडे लाकडाऊनमुळे घरात एकही पैसा शिल्लक नव्हता व बाहेर जात देत नव्हते. त्यांनी काही सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत दत्तवाड़ी पो. स्टेशनचे वरिष्ट पो. निरीक्षक देविदार घेवारे यांच्याशी संपर्क साधून मागितले की पेन्शन आणण्यास त्यांना वाडकी येथील बँकेत जावे लागते व इतक्या लांब जाणे शक्य नाही. त्यावर श्री घेवारे यांनी कॉन्स्टेबल आवारे यांना आदेश दिला की त्यांनी सदर जेष्ठ नागरिकास सोबत घेऊन खडकी येथील त्यांच्या बँक शाखेत घेऊन जावे. त्यानुसार श्री. आवारे हे २१ त्यांना कात्रजहून खडकी येथे लांब --२१ किमी घेऊन गेल, पेन्शन काढून दिली व परत आणले. वेळेवर मोलाची मदत मिळाल्याने हे जेष्ट नागरिक भारावून गेले व देवच धावून आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.


PN Vithal Khilare

# TAKING ON AMPHAN !

Police Naik Vithal Khilare of Vishrambaug Police Station was on duty at Shanipar Chowk, under a makeshift pandal, when cyclone Amphan struck Pune with all its ferocity. Sheets of rain pummeled the city with winds up to 65kmph making things worse. Caught in the midst of this fury were cops under a makeshift pandal at Shanipar Chowk, under Vishrambaug Police Station.

This when, almost Bahubali like, Vithal emerged, braving the winds and rain, and caught hold of the fluttering tarpaulin sheets, and battled the weather like a gladiator!

Says he. "It was tough, but I got the pandal together and it withstood the fury and protected me and my colleagues." His brave act had the internet in a tizzy, Whats app, you tube, facebook and even online news portals as well as all newspapers of the city big and small caried, what has now become an iconic symbol of a Khaki cad wamrior taking on the wrath of nature. Amphan met its khaki match!



## खाकी वर्दीतली माया !

वाहतूक पोलीस सुरेश शिंदे आणि पोलीस नाईक सुजय पवार हे चांदणी चौकात ड्युटीवर असताना त्यांना एक हृदयद्रावक बाब कळाली की तिथून १०० मीटरवरच एका लहान मुल बेवारस स्थितीत पडलेलं आहे. प्रत्यक्ष पाहिले असता लक्षात आले की एक ४ महिन्यांची मुलगी झाडाखाली होती. ती खूप रडत होती. तिला कशीबशी शांत करत आम्ही एक दुधाची बाटली मिळवली व तिला दूध पाजले. प्राथमिक तपासात काहीच न आढळल्यामुळे त्यांनी कोथरुड पोलीस स्टेशनला नेले. काही टीव्ही चॅनेल्स व इतर पब्लिसिटीमुळे त्या बाळाच्या पालकांचा शोध लागला व तिला त्यांच्याकडे सोपवण्यात आले. त्यांना समजही देण्यात आली शिवाय गुन्हाही दाखल केला. एका बाळाला तिचा मूलभूत हक्क मिळवून देण्यात खाकी टीम यशस्वी झाली .


PN Sujay Pawar

# PICK UP N DROP !

Pawar at Chandni Chowk were jolted when they heard that a babybhad been abandoned about a 100 meters away. Says Shinde, " We rushed to the spot and found a four month old baby abandoned under a tree crying. I immediately picked her up and quietened her. Then we arranged for a feeding bottle and gave her milk." Later after preliminary inquiries revealed nothing, the duo took her to Kothrud Police Station and left her there.

Thanks to the wide publicity including a few TV channels her parents were located and they were reunited." The parents were warned, says Sde and the police station also filed a case against them." What a pick up and drop this time the white of milk mixing with khaki!



## झरा माणुसकीचा !

हडपसर पो स्टेशनचे पी.एस.आय. गाडेकर लॉक डाऊन दरम्यान त्यांना रात्री साडे अकरा वाजता अप्पर पोलीस आयुक्त श्री. सुनील फुलारी एका ठिकाणी पुणे पोलीस ते मजूर, दोन महिला व तीन मुले असे बॉस घेऊन उभे आहेत, तिथे लगेच जाण्याचा आदेश प्राप्त झाला.

चौकशीअंती कळाले की ते मुंबईहून आले होते व बंगळुरूला जायचे होते. मी त्यांना समजावले की असे शक्य नाही व त्यांना गाडीतळावर नेले, जिथे एका शाळेत त्यांच्या झोपण्याची, खाण्यापिण्याची सोय पुढील १० दिवसांसाठी केली. तसेच संबंधितांना त्यांच्या परतीच्या प्रवासाबाबत व्यवस्था करण्यास सांगितले. काम मार्गी लागते न लागते तोच...

त्यांना एका वृद्ध महिलेला मदत करण्याबाबत संदेश आला. तिला आपल्या चुलत भावाचा नंबर आठवत होता, त्याच्याशी संपर्क साधल्यामुळे तो आला व तिला घेऊन गेला. त्यावेळी मी माझा नंबर त्यांना दिला होता. मी हे विसरलोही होतो मात्र नंतर पहाटे साडे तीन वाजता त्या आजींचा आभार मानण्यासाठी फोन आला, आणि मी भरून पावलो, माणुसकीचा झरा अखंड वाहतोय खाकी वर्दीच्या रूपात.



PSI S.S. Gadekar

# TOUCH THE HEART !

When PSI S.S. Gadekar attached to the Hadapsar Police station was on his night rounds during the lockdown, he got a call from his Additional CP Shri Sunil Phullari to rush to a spot where here were five or six laborens, two women and three children, all with bags. This was around 11:30 pm recalls Gadekar.

"On inquiry I came to know that the group had travelled from Mumbai and they said they wanted to head to Bengaluru. I managed to convince them that it was impossible and took them to Gadital, where there is a school, got them sleeping accommodation and arranged for their food for the next ten days, and also contacted the concerned authorities to arrange for their way back."

By the time good Samaritan Gadekar had finished this, he got another call from Phullari, telling him to come and take care of an old lady on a spot not too far away.

"She was pretty old, but remembered her cousin brother's number, we contacted him, and he came to pick her up I gave him my mobile and forgot about it. At 330 am she called to say thanks, and all my efforts bore fruit with just that call" say he with a grin Touching hearts the khaki way.

‘‘ शिपाई आम्ही खाकी सारे चोर गुंडांना भरे कापरे देश रक्षाया समाज राखाया, खाकी कधी मागे ना फिरे. ’’

**शंकर शिवाजी संपते**

**पो.ना. ७८१२, युनिट ४, गुन्हे शाखा, पुणे शहर**

---

‘‘ कौटुंबिक वादविवाद हे घटस्पोटापर्यंत न जाऊ देता जेव्हा दोन कुटुंबे एकत्र जोडली जातात. तेव्हा त्या दोन्ही कुटुंबाच्या हृदयात पोलिसांचा खरा देवदूत असतो. पोलीस ही एक शासकीय यंत्रणा नव्हे, तर सामाजिक संस्था आहे, ही संस्था सर्व लोकांच्या हृदयात विराजमान आहे. ’’

**विश्वजीत जगताप**

**स.पो.नि. वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

‘‘ लाटी पिस्तुल टाळ–मृदुंगच आहे. पेन वीणा माझी छान, छातीवर सजे रडगाणे ते फिर्यादीचे रोज पडे कानावर, तेच भजन–कीर्तन ठेवीं मज भानावर. ’’

**योगेश चंद्रकांत केंजळे**
**पो.शि. ९००४ समर्थ पोलीस स्टेशन**

‘‘ कपडे तर सर्वच लोक विकत घेऊन घालतात; पण खाकी वर्दी ही विकत घेता येत नाही. ती मेहनतीने कष्टाने कमवावी लागते. ’’

**हर्षदा सहदेव कांबळे**
**म.पो. ७११०, शिवाजीनगर पोलीस स्टेशन**



## 'खाकीतला देवदूत' !

लोकडाऊनचा पहिलाच दिवस लष्कर पोलीस ठाण्यातले तरूण पो.ना. रितेश काळे आपल्या राउंडवर निघाले या घालत असताना त्यांना फुटपाथवर एक महिला दिसली. तिच्यासोबत एक लहान मुलगा आणि कुशीत एक छोटे बाळ होते तिच्या अवस्थेवरूनच लक्षात येत होतं की मुलांना खायला घालणंही तिला अवघड झालं होतं. एवढंच नव्हे तर त्या तान्ह्या बाळाला अंगावरचं दूध पाजण्याचं त्राणही तिच्यात नव्हत. कारण ती स्वतःही उपाशी दिसत होती. हे पाहून काळेचं मन कळवळलं. या प्रसंगात आपण काय करू शकतो हा विचार त्यांच्या मनात आला. लाकडाऊनचा पहिला दिवस. रस्त्यावर चिटपाखरू नाही. सगळी दुकान बंद.या बाईला खायला द्यावं। काय आणि कस? अचानक त्यांना आठवलं की आपण घरातून निघताना घेतलेला जेवणाचा डबा आपल्याकडे आहे. आणि काळेंनी मागचा पुढचा विचार न करता, तो डबा त्या बाईला देऊन टाकला. ती बाई आणि जिच मूल पोटभर जेवले. ते पाहून काळेंनाही समाधान वाटते. या घटनेबाबत मला देवानेच ही बुध्दी दिली असं काळे म्हणतात त्यामुळेच सामान्य जनतेसाठी पोलीसही 'देवदूत' ठरले हेही तितकेच खरे ।


PN Ritesh Kale

# FOOD FOR THE SOUL !

During the first day of lockdown 1, young PN Ritesh Kale attached to the Lashkar Police Station, was on his rounds, when he spotted a lady with a toddler and a child sitting by the footpath. On reaching out to them, he found that she had no money to feed the babies, and was breast feeding the child, but told Kale that she had no energy left to do that as everything was shut and she hadn't had food.

Says Kale, "Even I was left thinking as no food stalls or tea shops, or restaurants were open. Suddenly, like a flash from almighty it dawned on me that I was carrying my tiffin. Without giving it a second thought I went to my bike, got it, and fed them. "The lady was so delighted, recalls Kale, that Ican now safely say that it was the most happy and blessed moment of my entire life" Indeed Kale, you have done Khaki proud and given the needy not only food for their stomach, but for their soul.



# पोलीसांनी केली 'घरवापसी' !

लोकडाऊनच्या काळात परराज्यातील कामगारांनी आणि विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी जायला सुरूवात केली. पुण्यातही हजारोंचे जथ्थे घरवापसीच्या तयारीत होते. कोणी उत्तर प्रदेशात तर कोणी बिहारला कोणी ओरिसाला तर कोणी राजस्थानला चक्क पायी जाण्याचा निर्णय घेतला हे सगळे हृश्य पाहून विभाग चे पोलीस उपायुक्त श्री पंकज देशमुख यांच्या मनात एक विचार आला. त्यांनी लगेच विमानतळ पो. स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या साथीने एक टीम सज्ज केली. या पोलीसांनी सुमारे १३५५० परप्रांतियांना पायी जाण्यापासून रोखले. त्यांच्या खाण्यापिण्याची सोय केली. एवढेच नव्हे तर त्यांना मास्क आणि सॅनिटाइजरही दिले. यासाठी त्यानी रूपसेवी संस्थांची मदत घेतली. या हजारो परप्रांतियांसाठी अगदी कमी दरात वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून दिली आणि राज्य सरकारच्या परिवहन मंडळाच्या बस देखील अगदी मोफत उपलब्ध करून दिल्या. कारण एवढ्या लांब चालत घर गाठायच ही कल्पना पोलीसानांही मान्य नव्हती. आणि म्हणूनच पोलीसांची टीम अगदी अहोरात्र काम करीत होती. या मध्ये पो.नि. गजानन पवार हे धडाडीने कार्य करत होते. हे.कॉ. नवगुणे तर तहानभूक विसरून या तयारीत गुंतले होते विमानलळ पो. स्टेशनच्या पोलीसांनी घेतलेल्या या परिश्रमांमुळेच या परप्रांतियांची अगदी सुरक्षितपणे आरामात 'घरवापसी' झाली .



Sr PI Gajanan Pawar HC Lakshman Navgane

# MOVING THE MASSES !

The three khaki musketeers have done a job unlike any other, with the help of the owner of Wagheshwar Travels, DCP Zone Four, Pankaj Deshmukh, Sr. PI Gajanan Pawar of Vimantal Police Station, and HC Lakshman Navgune, also attached to Vimantal Police Station moved more than 13550, laborers and students from Uttar Pradesh, Bihar, Rajasthan, Orissa, to their destinations.

Says Pawar, "We apprehended them as they were walking towards their homes, and made them comfortable, served food and water, and even gave them masks and sanitizers." Navgane, who was assigned the task of coordination with all groups, including NGO's who facilitated the food, water and masks, and sanitizers as well as, the travel agents who heavily discounted fares and later State Transport authorities who provided free transport, recollects It was a very satisfying experience and all credit to Sr PI Pawar sir, and DCP Deshmukh Sir for having taken this initiative.

Colleagues recall Navgane going without food and water himself for hours, and running from pillar to post to ensure that things run smoothly and everything goes like clockwork.

Indeed a mammoth task, not only well coordinated, but extremely well conducted, showing how supethuman tasks can be done simply the khaki way.



## पोलीसांचे 'अन्नछत्र' !

भारती विद्यापीठ पो. स्टेशनचे पो.ना. प्रणव संकपाळ नाकाबदीच्या ड्युटीवर होते. तेवढ्यात परिसरातीलमजुरांचा एक घोळका त्यांच्याकडे अन्नाची विनवणी करू लागला. ही बातमी संकपाळ नी आपल्या स्टेशनचे पो.नि. वसंत कुंवर व पो.नि, विष्णू ताम्हाणे पांना कळवली. या दोघांनीही लगेच एक टीम बनवून पो.उप.नि. महेंद्र पाटील यांना स्वयंसेवी संस्थाशी संपर्क साधून जेवणाची व्यवस्था करण्यास सांगितले, स्वयंसेवी संस्थांनी अन्न शिजतून काही पाकिटातून तर काही पातेल्यातून दिले. पण आता प्रश्न होता तो, हे अन्न वाटायला माणस आणायची कुठून? मग पोलीसांनीच आळीपाळीने पुढाकार घेतला आणि काही पोलीस मित्रांच्या मदतीने हे अन्न रस्त्यावरच्या अनेक भुकेल्या गोरगरिब व मजुरांपर्यंत पोहचविलं. एक दोन दिवस नव्हे तर जोपर्यंत या मजुरांना काम मिळत नाही किंवा ते गावी परत जात नाहीत तोपर्यंत पोलीसांचे हे अन्नछत्र निरंतर सुरू होते. आणि यासाठी आपल्या जेवणाच्या सुट्टीतून वेळ काढून इतरांची पोटं भरणाऱ्या या पोलीस टीमचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.


Pranav Sankpal

# COMMUNITY CARE !

When Police Naik, Pranav Sankpal attached to the Bharatiya Vidiyapeeth Police Station, was on his naka bandi, the mazdoors of the area used to accost him asking for food during lockdown 1. He then appraised his station PI Vasant Kunwar and PI Vishnu Tahamane, who then set up a team, and the team incharge was PSI Mahendra Patil to approach various NGO's and request them to organize the food. Says he. "They started to make food for them, some loose and some in packets, but then there weas no one to distribute it, so we used to take tums, me and my colleagues and another dozen police mitrasin our official vehicles to get the food and distribute it. Sankpal remembers, "We had given them between one pm and two pm to assemble for lunch and between 8 and 9 pm for dinnet and all of us then used to feed them till the time, they either went back, or found work and money here A shining example of conmunity care from the khaki wartiors who really showed how much they care!



# पोलीसांनी टाळली नागरिकाची आत्महत्या !

लॉकडाऊन ५ मधली ही घटना मुंढवा पो.स्टे चे पो. ना. अमोल चव्हाण यांना कंट्रोलरूम मधून फोन आला, केशवनगरमध्ये आत्महत्येचा प्रयत्न सुरू आहे. हे ऐकताच चव्हाण आणि पो.कॉ. सचिन पाटील हे ताबडतोब निघाले. त्यांच्या पाठोपाठ ओगळे, चौधरी व काकडेही घटनास्थळी धावले. तिथे गेल्यावर दिसलं की, साधारण चाळीशीतले एक गृहस्थ पंख्याला दोरी अडकवून गळफास घेण्याच्या प्रयत्नात होते. चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या गृहस्थांना आत्महत्येपासून रोखलं. पाणी पाजलं आणि आपले वरिष्ठ अधिकारी व पो.नि. संपतराव भोसले व पो.उप.नि. राजेंद्र घाडगे याना या घटनेबाबत कळवले. त्यानंतर वरिपाच्या सल्ल्यानुसार चव्हाण आणि सहकाऱ्यांनी त्यांना समजावून सांगितले. त्या गृहस्थानी ज्याच्याकडून कर्ज घेतलं होतं. त्याच्याशी पोलीस बोलले नतर दुसऱ्या दिवशी चव्हाणांनी त्या व्यक्तीशी संपर्क साधता तेव्हा ती व्यक्ती नॉर्मल झालेली होती आणि आत्महत्येचा विचारही त्यांनी डोक्यातून काढून टाकला होता पोलीसाच्या या कामगिरीमुळे केवळ एक जीव वाचला नाही तर एक कुटुंब उद्धवस्त होण्यापासून रोखले गेले.




# IN THE NICK OF TIME !

Police Naik, Amol Chavan attached to Mundhwa Police Station, was on duty and got a call from Control Room during lockdown 5.0 stating that there was a potential suicide case ongoing in Keshav Nagar. Both Chavan and Police Constable Sachin Patil rushed to the spot, another team consisting of Ogale, Chaudhary and Kakde also rushedto the site. Recollects Chavan, "We made it in just about four minutes, and found the door locked. Somehow, we opened it, and found that the forty-three-year-old male was trying to hang himself from the fan." Chavan and his team managed to get him down, and made him sit, gave him water and then called their seniors, Sr PI Sampatrao Bhosale, and PSI Rajendra Ghadge, who then guided Chavan and his colleagues. "On the advice of seniors, we counselled him, told him that we would speak to those who had loaned him money, and made him understand that suicide was not the way. Next day we followed up and he was absolutely normal. It was a great relief to all of us." Trust the Khaki tribe to reach in time, or in the nick of time and save a life.




## पोलीसांची ‘इमर्जन्सी ॲक्शन’ !

‘हॅलो, चांदणी चौकात एक ॲम्ब्युलन्स पलटी झालेली आहे. ताबडतोब पोहचा’ कोथरूड पो.स्टे.चे उप.व.नि. अब्दुल रहमान शेख यांना हा निरोप मिळाल्यावर ते लगेचच आपले सहकारी पो.कॉ. अक्षय इंगवले यांच्यासोबत घटनास्थळी पोहचले. ॲम्ब्युलन्स म्हटल्यावर आतमध्ये कोविड पेशंट असू शकतात. हा विचार करून दोघांनीही मास्क व हातमोजे घालून सर्वांना बाहेर काढले. त्यातील एकजण गंभीर जखमी होता. दुसरी ॲम्ब्युलन्स येईपर्यंत वाट बघण्यापेक्षा त्या दोघांनी पोलीस जीप मधूनच सर्वांना जवळच्याच हॉस्पिटलमध्ये? हलवले. पण तिथे जागा नहती. मग तिथूनच गाडी लवळेच्या सिम्बॉयसिस हॉस्पिटलमध्ये नेली आणि सर्वांना भरती करण्यात आले. हे सगळे करत असताना शेख व इंगवले यांच्या मनात स्वतःच्या आरोग्याच्या विचार एक सेकंदही आला नाही. उलट या सगळ्यांना वाचवले पाहिजे या भावनेतूनच त्या दोघांनी जी तत्परता दाखवली. ती पोलीस दलाची शान वाढविणारी ठरती




# ACCIDENT DAMAGE REPAIR !

When ASI Abdulrehran Shaikh attached to the Kothrud Police Station gatacall fut an ambulance had over turned at Chandri Chowk, he and his colleague Police Constuble Akshay Ingawle reached the spot in minutes Recollects Shaikh, "We were told that they were possible Covid 19 positive patients so we donned our masks and gloves and pulled them out of the overturned ambulance. One of theme was badly injured, and after giving them water, we tied to call another ambulance but to no avail so the next thing to do wes put all of them in the police car and take fhem to the nearest hospital However, since the nearest hospital was full up Shakh and hs partner droe to the Symbiosis Hospital at Lavle and got them admitted there ee not womed abut ourselves one bit its our duty after all says Shakh Yet once again the men in khaki proved their worth in gold.

‘‘ सिनेमातला नट तीन तास वर्दी घालुन हिरो होऊ शकतो, तर तुम्ही सेवेतील ३० ते ३५ वर्षे जनतेची सेवा बजावून खरे सुपरहिरो का होऊ शकत नाहीत. ’’

**बी.पी. शेळके**

**पोलीस उपनिरीक्षक, कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

‘‘ जेव्हा प्रचंड गर्दीमध्ये खाकी रंग दिसतो, तेव्हा न बोलता बघणाऱ्यांचे भाव बोलून जातात की, ते सगळे नीट असणारच. ’’

**सरोजा राजू देवर**

**म.पो.शि. ९४१६**

## Citizen’s PULSE

# 83%

Citizens have appreciated
the work done by
Pune Police

Total **22791** Punekars responded

# Top 10 Attitude/Activities of POLICE Perceived & Mentioned by PEOPLE

1 कर्तव्य निष्ठता

**Commitment** towards duty

2 कायदा व सुव्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी पोलीसांकडून सातत्याने प्रयत्न

**CONTINUOUS** efforts by Police to ensure Law & Order

3 कठीण काळातही काम करण्याची कटीबद्धता

**COMMITMENT** to work under pressure

4 पोलिसांच्या स्वयंप्रेरीत वर्तनाचे अत्यंत कौतुक आहे

Highly appreciate the **PROACTIVE** behaviour

5 मदतशील व सहाय्यकारी वर्तन

Helpful nature & **SUPPORTIVE** behaviour

6 शिस्तबद्ध पोलीस दल

**DISCIPLINED police force**

7 आवश्यकतेनुसार कर्तव्यकठोर

They are **STRICT** where it is required for our benefit

8 लॉकडाउनची कठोर अंमलबजावणी

Good implementation of **LOCKDOWN**

9 सामाजिक अंतर राखण्यासाठी चांगली अंमलबजावणी

Good execution in maintaining **SOCIAL DISTANCING**

10 नाविन्यपूर्ण पद्धती

**INNOVATIVE** ways

(Source : SDG Center of Excellence, Pune in association with Pune Police, May 2020)

All memes courtesy : rebootplus.digital.

**English copy :** Sanjay Sayani. **Marathi copy :** Sohail Shaikh, Vaibhav Chikodikar

**Design :** Vineet Ojale, Vaibhav Chikodikar .